DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021

कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, अंबरनाथ-बदलापूर, भिवंडी, उल्हासनगर, मुरबाड, शहापूर.

**आतील पानांत**


जिल्हास्तरावर आरोग्यसुविधांचा पुरेसा साठा आतापासूनच राखून ठेवा; पंतप्रधानांचे आदेश

रेल्वेचे अतिरिक्त डबे खाजगी कंपन्यांना भाडेतत्त्वावर देणार

राज्यातील साखर कामगारांना १२ टक्के वेतनवाढ



# ठाणेवैभव

www.thanevaibhav.in

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ

भारतीय सौर दिनांक भाद्रपद २१ शके १९४४ | वर्ष ४७ | अंक १८ | रविवार १२ सप्टेंबर २०२१ | पाने ८ | रु. ४

संपादक : मिलिन्द बल्लाळ




रविवार विशेष
तरुणाई
>>पान ५ वर

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ठरल्याप्रमाणेच होणार ?

- स्थगितीला सर्वोच्च न्यायालयाचा नकार
- ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेण्याची जबाबदारी आयोगावर

**ठाणे: सर्वोच्च न्यायालयाने इतर मागासवर्गीयांच्या मुद्द्यावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना स्थगिती देण्यास नकार दिल्याने निवडणुका घेण्याबाबतचा चेंडू निवडणूक आयोगाच्या कोर्टात गेला आहे.**



न्यायालयाने निवडणुकांमधील इतर मागासवर्गीयांचे आरक्षण रद्द केले होते. जोपर्यंत आरक्षणाचा प्रश्न निकाली निघत नाही तोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न घेण्याचा निर्णय सर्वपक्षीय नेत्यांनी घेतला होता. काही जणांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. आज न्यायालयाने निवडणुकांना स्थगिती देण्याचा अधिकार राज्य सरकारला नसल्याचे स्पष्ट केले. ओबीसीच्या आरक्षण मुद्द्यावर राज्य सरकार निवडणूक स्थगित करु शकत नाही. हा सर्वस्वी राज्य निवडणूक आयोगाचा निर्णय आहे. कोरोनाच्या मुद्द्यावर निवडणूक आयोग निवडणुकांना स्थगिती देऊ शकतो, परंतु ओबीसीच्या मुद्द्यावर मात्र स्थगिती देता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

राज्यातील जिल्हा परिषदेच्या आणि कल्याण-

>>पान २ वर

## प्राणवायूवर ४.४ टक्के रुग्ण; ठाणेकरांसाठी धोक्याची घंटा

**ठाणे:** शहरातील कोरोना रुग्णवाढीची गती थोडी कमी झाली असून आज नवीन 55 रुग्णांची भर पडली आहे तर 63जण कोरोनामुक्त झाले आहेत. एकाही रुग्णाचा आज मृत्यू झाला नाही, परंतु प्राणवायूची मदतीने उपचार घेत असलेल्या रुग्णांची संख्या 4.4 टक्के झाली असून ठाणेकरांसाठी ही धोक्याची घंटा ठरु शकते.

महापालिका हद्दीतील कोरोना हॉट स्पॉट असलेल्या माजिवडे-मानपाडा, वर्तकनगर आणि उथळसर या प्रभाग समिती क्षेत्रात अनुक्रमे 16, 13 आणि 10 रुग्ण वाढले आहेत. आठ रुग्णांची भर कळवा प्रभाग समिती भागात पडली आहे. नौपाडा-

>>पान २ वर

## ठाणे जिल्ह्यात दिवसभरात 36224 नागरिकांचे लसीकरण

**ठाणे :** कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहिमेत ठाणे जिल्ह्यात आज रात्री आठपर्यंत 36 हजार 224 नागरिकांचे लसीकरण करण्यात आले आहे.

जिल्ह्यात आतापर्यंत एकूण 55 लाख 24 हजार 360 नागरिकांचे लसीकरण करण्यात आले असून त्यापैकी 39 लाख 33 हजार 248 नागरिकांना पहिल्या डोसचे तर 15 लाख 91 हजार 112 नागरिकांना दुसरा डोस देण्यात आला आहे. आज दिवसभरात लसीकरणाचे सुमारे 238 सत्र आयोजित करण्यात आले.






## ४० लाखांच्या खंडणीसाठी मुलाचे अपहरण; चौघांना अटक

**कल्याण :** 40 लाख रुपयांच्या खंडणीसाठी अंबरनाथमधील वडापाव विक्रेत्याच्या 9 वर्षीय मुलाचे अपहरण करणाऱ्या चौघांना अटक करण्यात क्राईम ब्रँचच्या कल्याण युनिटला यश आले आहे.

अंबरनाथ पूर्वेकडे राहणाऱ्या सोनूकुमार बारेलाल सविता यांचा वडापाव विक्रीचा व्यवसाय आहे. त्यांनी 9 सप्टेंबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सोनूकुमार यांच्या कृष्णा नावाच्या नऊ वर्षाच्या मुलाचे अपहरण झाले होते. कृष्णा चौथ्या इयत्तेत न्यू डेक्कन इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षण घेतो. सद्या शाळा बंद असल्यामुळे तो घरीच असतो. परंतु जवळच असलेल्या ट्युशनसाठी जात असतो. बुधवारी 8 सप्टेंबर रोजी सायंकाळी 7 नंतर परशुराम रेसिडेन्सी येथून येत असताना अज्ञात इसमाने त्याचे अपहरण केले. आई-वडिलांना कृष्णा सुखरूप परत हवा असेल तर चाळीस लाख रुपये खंडणी द्यावी लागेल, अशी धमकी इंटरनेट कॉल वापरुन अपहरणकर्त्याने दिली.

>>पान २ वर

## विघ्नहर्त्याकडे भक्तांनी मागितले कोरोनामुक्तीचे दान

### जिल्ह्यात ३८३७३ बाप्पांना भावपूर्ण निरोप



**ठाणे:** जिल्ह्यात शनिवारी दीड दिवसांच्या लाडक्या बाप्पाला गणेश भक्तांनी कोरोनाचे नियम पाळत भक्तीभावाने निरोप दिला. कोरोनापासून कायमची मुक्ती मिळू दे, अशी प्रार्थना भक्तांनी केली. जिल्ह्याच्या विविध भागात 38 हजार 373 बाप्पांना निरोप देण्यात आला.

निर्बंधमुक्त गणेशोत्सवाचे संकेत राज्य सरकारने दिले असले तरी आज काही निर्बंध पाहायला मिळाले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गणेश भक्तांनीही नियम पाळत आणि साध्या पध्दतीने शनिवारी गणरायाचे विसर्जन

>>पान २ वर

## ठाणे परिवहन सेवेत दाखल होणार २० इलेक्ट्रिक बसेस

**ठाणे :** 20 बसेस घेण्यासाठी 23 कोटींचा निधी मंजुर झाला असून लवकरच या बसेस परिवहनच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. यामुळे शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यास मदत होणार आहे.

ठाणे महापालीकेच्या हद्दीत शंभर इलेक्ट्रीक बसेस घेण्याबाबत साडेतीन



वर्षांपूर्वी प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. परंतु त्यानंतर केवळ एकच बस परिवहनच्या ताफ्यात दाखल झाली होती. ती देखील सध्याच्या घडीला बंद अवस्थेत आहे. परंतु परिवहनची नवीन समिती गठीत झाल्यानंतर पुन्हा 100

>>पान २ वर

**मंजूर झालेल्या 23 कोटीच्या निधीमधूनच परिवहन सेवेला शहरात दोन चार्जिंग स्टेशन उभारायचे आहेत. ते कुठे उभारायचे याकरिता सध्या पडताळणी सुरु आहे. मुल्ला बाग, आनंद नगर येथील जुना जकात नाका आणि सॅटिस पूर्व येथील जागेचा विचार सुरु असल्याचे कळते.**






## २२ गावांची वाट चिखलात हरवली

### १९ किमीच्या पेंढरी-बोराळा रस्त्याची दुरवस्था

**शहापूर:** शहापूर तालुक्यातील अघई ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील पेंढरी ते बोराळा हा 19 किलोमीटरचा रस्ता गाव पाड्यांवर जाण्या-येण्यासाठी व्यवस्थित नसल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात मातीकरण करून सोडलेला रस्ता चिखलमय होऊन त्यावर गाळ साचलेला असतो. यामुळे अनेक दुचाकी आणि चारचाकी वाहनांची फसगत होते.

हा रस्ता शासनाच्या कुठल्या ना कुठल्या योजनेतून मंजूर करून तो तयार करण्यात यावा, यासाठी स्थानिक नागरिकांमधून मागणी केली जात आहे.

एखादी व्यक्ती आजारी पडली परिसरातील नागरिकांना पेंढरी आणि बोराळा या खडतर रस्त्यावरुन

>>पान २ वर

## भांडण सोडवण्यास गेला आणि जीवास मुकला

**कल्याण :** मस्करीत शिवीगाळीचे भांडणात रुपांतर होत असल्याने ते सोडविण्यासाठी गेलेल्या अनिल दुधाडे याला भावाला मारत असल्याच्या गैरसमजातून चाकूने भोसकून हत्या केल्याची घटना म्हारळ गाव येथे घडली. टिटवाळा पोलिसांनी सात तासात दोन्ही आरोपींच्या मुसक्या आवळण्यात यश मिळाले आहे.

म्हारळ गावातील एका किराणा स्टोअर्सच्या जवळ 10 सप्टेंबर रोजी रात्रीच्या सुमारास दिनेश उर्फ बाळा सुरडकर यांच्याबरोबर संदीप राजू डामले या दोघा मित्रांची मस्करी सुरु असतानाच शिवीगाळ व हातापायी होत भांडणे सुरु झाली.

>>पान २ वर




### कोरोना महामारी दूर करण्यासाठी मनसेच्या वतीने साईबाबांची महाआरती

# मंदिरे न उघडल्यास आघाडी सरकार विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा मनसेचा इशारा

**कल्याण :** कोरोनारुपी महा भयंकर राक्षसाचा नायनाट करण्यासाठी कल्याणमध्ये मनसेच्या वतीने साईबाबांची महाआरती करण्यात आली. जिल्हाध्यक्ष उल्हास भोईर यांच्या पुढाकाराने करण्यात आलेल्या या आरतीमध्ये कोरोना आजारापासून मुक्तता देण्यासाठी साईबाबांना साकडे घालण्यात आले. तर भाविकांना दर्शनासाठी मंदिरे त्वरित न उघडल्यास महाआघाडी सरकार विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा मनसेच्या वतीने देण्यात आला.



यावेळी माजी आमदार तथा मनसे सरचिटणीस प्रकाश भोईर, जिल्हा अध्यक्ष उल्हास भोईर, शहर अध्यक्ष कौस्तुभ देसाई, रस्ते आस्थापना जिल्हा अध्यक्ष रोहन आक्केवार, जनहित-विधी कक्ष शहर अध्यक्ष उदय वाघमारे, रस्ते आस्थापना शहर अध्यक्ष रोहन पोवार, विद्यार्थी सेना शहर अध्यक्ष विनोद केणे, महिला शहर अध्यक्षा शितल विखणकर आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

100 वर्षापूर्वी शिडीत व आजुबाजुच्या गावांमध्ये महामारीने हाहाकार उडवला होता. आजुबाजुच्या गावातील कित्येक लोकांना त्यांचा जीव गमवावा लागला. त्यावेळी शिर्डीतील संत साईबाबा यांनी आपल्या चमत्काराने ही महामारी शिर्डीच्या वेशीवरच संपुष्टात आणली. आजची परिस्थिती लक्षात घेता अशाच चमत्काराची गरज आहे. कोरोनासारख्या महामारीमुळे लोकांचे जीवन विस्कळीत झाले आहे. बऱ्याच लोकांनी आपला जीव गमावला आहे. त्यामुळे कोरोना महामारी महाभयंकर राक्षसाचा नायनाट करण्यासाठी खडकपाडा साईचौक येथील साईबाबा मंदिरात महाआरतीव्दारे साईबाबांना विनवणी करण्यात आली असल्याची माहिती उल्हास भोईर यांनी दिली

भाविकांना दर्शनासाठी मंदिरे बंद असल्याने यावेळी मनसेच्या वतीने आघाडी सरकार विरोधात नाराजी व्यक्त करण्यात आली. तसेच लवकरात लवकर मंदिरे उघडण्याची मागणी देखील केली. मंदिरे लवकर न उघडल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देखील यावेळी मनसेच्या वतीने देण्यात आला. दरम्यान मंदिरामध्ये आरती करणाऱ्या मनसेच्या पदाधिकाऱ्यांना खडकपाडा पोलिसांनी ताब्यात घेतले होते.

# गणेशोत्सवामुळे कल्याणच्या फुल मार्केटमध्ये फुलांचा भाव वधारला

**कल्याण:** गणेशोत्सवामुळे कल्याणच्या फुल मार्केटमध्ये फुलांचा भाव चांगलाच वधारल्याचे पाहायला मिळाले. विशेष म्हणजे कोरोनाची भीती विसरुन नागरीकांची फुले खरेदीसाठी सकाळपासूनच झूबंड उडाली होती. मात्र यावर्षीच्या गणपती उत्सवाला महागाईची झळ बसली आहे. यामुळे नागरिकांच्या आर्थिक चिंता वाढल्या असून गणपतीत सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या फुलांच्या किमती दुपटीने वाढल्या आहेत.

कोरोना आटोक्यात येऊ लागल्यानंतर जनजीवन पूर्वपदावर येत असले तरी अजूनही आर्थिक घडी बसली नाही. त्यात पेट्रोल, डीझेल, घरगुती गॅसबरोबर खाद्य तेलाच्या किमती सुद्धा वाढल्या आहेत. यावर्षी शासनाकडून कोरोना प्रादुर्भाव कमी झाल्याने सणावरील निर्बंध शिथिल करण्यात आल्याने यावर्षी नागरिकांमध्ये सणाचा उत्साह पहायला मिळत आहे. यामुळे घरोघरी गणपतीच्या आगमनाची तयारी सुरु झाली आहे. त्यात पर्यावरणपूरक नैसर्गिक आरास सजावटीला विशेष महत्व दिले जाते. यासाठी मोठ्या प्रमाणत वेगवेगळ्या फुलांची मागणी होत असते. या काळात मोठ्या प्रमाणात फुलांची विक्री केली जाते.



**फुलांचा दर**

**झेंडू 80 ते 100 रु.किलो, गुलाब 200 ते 225 रुपये, शेवंती 150 ते 180 रुपये किलो, मोगरा 90 ते 120 किलो, डेझी 30 ते 50 रुपये जुडी, अस्टर : 30 ते 40, कार्नेशियन :160 ते 180 रुपये 10 फुले, जीडाली: 110 ते 120 रुपये 10 फुले, आर्केड: 900 ते 1000 रुपये 10 फुले, जरबेरा : 80 -100 रु.10 फुले**

दीड दिवसांचे आणि पाच दिवसांच्या गणपतीची संख्या वाढल्याने फुलांची मागणी वाढली आहे. गणपतीच्या सजावटीसाठी झेंडू, मोगरा, गुलाब, शेवंती, याच बरोबर परदेशी आर्केड, जरबेरा, कार्नेशियन, जीडाली, डेझी अशा फुलांची मागणी सुद्धा वाढली आहे. पण मागील दोन वर्षांच्या कोरना काळानंतर बाजार खुलले असल्याने ही फुले बाजारात उपलब्ध होत आहेत. पण त्यांच्या किमती दुपटीने वाढल्या आहेत. थर्माकोल आणि पीओपीच्या सजावटीपेक्षा नैसर्गिक सजावटीकडे नागरिकांचा कल असल्याने फुलांच्या किमती वाढल्या असल्या तरी मागणी होत आहे.

मागील दोन वर्षांपासून फुलविक्रेते मोठ्या आर्थिक संकटात सापडले होते. यावर्षी काही दिलासा मिळाला आहे. त्यात वाहतुकीचा, मजुरीचा खर्च वाढला असल्याने फुलांच्या किंमती वाढल्या असल्याचे फुल विक्रेत्यांनी सांगितले.

पान १ वरुन

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ठरल्याप्रमाणेच होणार ?

डोंबिवली, नवी मुंबई, वसई विरार या महापालिकांची मुदत संपलेली आहे. तेथे एक ते दीड वर्षापासून प्रशासकीय राजवट लागू आहे. आगामी वर्षात फेब्रुवारी-मार्च महिन्यात 18 महापालिकांची मुदत संपणार आहे. ओबीसी आरक्षणाचा प्रश्न त्यांची जनगणना झाल्याशिवाय होऊ शकणार नाही, त्यामुळेच राज्य सरकारने या निवडणुकांना स्थगिती देण्याचा निर्णय घेतला होता, परंतु न्यायालयाने स्थगिती देण्यास नकार दिल्याने निवडणूक आयोग कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्यातील कोरोना रुग्णांची संख्या वाढली तर निवडणुकांना स्थगिती मिळू शकते असे राजकीय विश्लेषण करणाऱ्यांचे मत आहे.

## प्राणवायूवर ४.४ टक्के रुग्ण; ठाणेकरांसाठी धोक्याची घंटा

नौपाडा-कोपरी प्रभाग समिती येथे तीन आणि लोकमान्य-सावरकरनगरमध्ये दोन रुग्ण सापडले आहेत. प्रत्येकी एक रुग्ण वागळे आणि दिवा प्रभाग समिती भागात मिळाले आहेत तर सर्वात कमी शून्य रुग्ण मुंब्रा येथे नोंदवले गेले आहेत.

विविध रुग्णालयात आणि घरी उपचार घेत असलेल्या रुग्णांपैकी 63 रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत. आत्तापर्यंत एक लाख 35 हजार 200 रुग्ण ठणठणीत बरे होऊन घरी गेले आहेत तर रुग्णालयात आणि घरी 637 जणांवर उपचार सुरु आहेत. त्यामध्ये 121जण प्राणवायूवर आहेत. हे प्रमाण 4.4 टक्के आहे. पालिकेकडे दोन हजार 723 ऑक्सिजन बेड आहेत. आज एकाही रुग्णाचा मृत्यू झाला नसून आत्तापर्यंत दोन हजार 87जण दगावले आहेत.

महापालिका प्रशासनाने काल शहरातील एक हजार 571 नागरिकांची कोरोना चाचणी घेतली होती. त्यामध्ये 55जण बाधित मिळाले होते. आत्तापर्यंत 19 लाख 40 हजार 452 ठाणेकरांची चाचणी घेण्यात आली असून त्यामध्ये एक लाख 37 हजार 922जण बाधित सापडले आहेत.

## विघ्नहर्त्याकडे भक्तांनी मागितले कोरोनामुक्तीचे दान

ठाणे महापालिकेच्या माध्यमातून विसजर्नासाठी ऑनलाईन बुकींग स्लॉट तयार करण्यात आले होते. तसेच नागरीकांची गैरसोय होऊ नये यासाठी ठिकठिकाणी गणोश मुर्ती स्वीकृती केंद्र स्थापन करण्यात आले होते. याशिवाय गणेश विसर्जन घाटांची देखील निर्मिती करण्यात आली होती. अनेकांनी घरीच बाप्पाचे विसर्जन केले.

ठाण्यासह कल्याण, डोंबिवली, मीरा-भाईंदर, उल्हानगर, भिवंडी, अंबरनाथ, बदलापूर या भागातही बाप्पांना साश्रुनयनांनी निरोप देण्यात आला. ठाणे पोलीस आयुक्तालयात 38 हजार 373 बाप्पांना निरोप देण्यात आला. यात 38 हजार 293 खाजगी तर 80 सार्वजनिक गणपतींचा त्यात समावेश होता.

## ४० लाखांच्या खंडणीसाठी मुलाचे अपहरण; चौघांना अटक

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन संपूर्ण तपास यंत्रणा कामाला लागली. कृष्णाला अपहरणकर्त्यांच्या तावडीतून सुखरुप सोडवून आणण्यासाठी क्राईम ब्रँचने तपासाला वेग वाढला होता. त्यासाठी घटना घडलेल्या परिसरातील सर्व महत्त्वाच्या ठिकाणी पाहणी करण्यात आली. त्या ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले. त्यावरुन संशयित इसमाचे फोटोग्राफ्स तयार करण्यात आले. संशयिताच्या वर्णनाप्रमाणे कुणी व्यक्ती या परिसरात आली आहे अगर कसे याविषयी सर्व ठिकाणी स्थानिक पोलिसांसह क्राईम ब्रँचने सर्वत्र शोध घेतला. संगणक तज्ज्ञांची देखिल मदत घेण्यात आली.

तांत्रिक विश्लेषण व प्रत्यक्ष फिल्डवरील माहितीचे साह्य घेऊन कृष्णाचे अपहरण करणाऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी सर्व यंत्रणांनी तपास चक्रांना वेग दिला. क्राईम ब्रँचच्या युनिटचे विनोद चन्ने, किशोर पाटील आणि बाळा पाटील यांना गोपनीय माहिती प्राप्त झाली. त्यानुसार वपोनि विलास पाटील, सपोनि भूषण दायमा, फौजदार मोहन कळमकर यांच्यासह पथकाने सापळा रचला आणि अपहृत कृष्णाला अपहरणकर्त्यांच्या तावडीतून सुखरूप सोडवून आणले. त्याचबरोबर खंडणीसाठी कृष्णाच्या अपहरणाचा कट रचणाऱ्या चारही अपहरणकर्त्यांना ताब्यात घेतले. प्रभात कुमार अमरसिंह (30), अमजद मन्सूर खान (23), योगेंद्र जवाहरलाल सिंग (20), सुनिल सिताराम लाड (57) अशी आरोपींची नावे आहेत.

अपहरणकर्त्यांनी अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने कट रचून कृष्णाशी ओळख वाढवली. त्याच्यासोबत क्रिकेट खेळणे, चॉकलेट देणे, गप्पा मारण्याच्या माध्यमातून त्यातील एकाने कृष्णाशी मैत्री केली. मात्र स्वतःचे नाव कृष्णाला कळू दिले नाही. अपहरणकर्त्यांनी कृष्णाचे अपहरण केले



मात्र त्याला काहीही कळू न देता त्याच्या आई-वडिलांकडे चाळीस लाख रुपयांची मागणी केली. पैसे दिले नाही तर तुमच्या मुलाला ठार मारण्यात येईल, अशीही अपहरणकर्त्यांनी धमकी दिली होती. मात्र अपहरणकर्त्या चौघांच्या तावडीतून कृष्णाची सुखरूप सुटका करण्यात क्राईम ब्रँचला यश आले असल्याची माहिती अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे अशोक मोराळे यांनी दिली.

## ठाणे परिवहन सेवेत दाखल होणार २० इलेक्ट्रिक बसेस

इलेक्ट्रीक बसेस घेण्यासाठी प्रयत्न सुरु केले. जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून प्रयत्न केले जात होते.

केंद्र सरकारने 15 व्या वित्त आयोगाच्या तरतुदीनुसार पर्यावरणाचा समतोल राखला जावा, याकरिता महापालिका आणि नगरपालिका यांना विविध उपाययोजना करण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी दिला जात असतो. या निधीतूनच ज्या महापालिका आणि नगरपालिकेची लोकसंख्या 10 लाखांहून अधिकची आहे, अशा शहरांमध्ये प्रदूषण कमी व्हावे, हवेचा दर्जा सुधारावा, याकरिता त्या शहरात इलेक्ट्रीक बसेस चालवून हवेची गुणवत्ता सुधारण्यास मदत करावी. या हेतूने त्यांना निधी उपलब्ध करून देण्याची तरतूद केली आहे. विशेष म्हणजे यासाठी परिवहन समिती सभापती विलास जोशी यांच्या नेतृत्वाखाली सर्व समिती सदस्यांनी पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

इलेक्ट्रिक बसेस आकाराने लहान असू शकतात. अशा प्रकारच्या बसेस नवी मुंबई, नाशिक, पुणे परिवहन सेवांच्या ताफ्यात यापूर्वीच दाखल झाल्या आहेत. त्यानुसार त्याची माहिती घेऊन बसेस घेण्याचे नियोजन ठाणे परिवहन सेवेने आखले आहे.

## २२ गावांची वाट चिखलात हरवली



रुग्णालय गाठावे लागत आहे. याचाच अनुभव गाव-पाड्यांमधील वृद्ध नागरिकांसह युवकाला झोळी करून, खांद्यावर घेऊन किंवा दुचाकी वाहनावरून दवाखान्यात दाखल करताना येत आहे. 22 गावांचा संपर्क असलेल्या हा पूर्वापार कच्चा रस्ता; पण सध्या या रस्त्याची दुरवस्था झाल्याने या वस्तीवरील लोकांना जाण्यासाठी दुसरा पर्यायी मार्ग नाही. सध्याच्या पावसाने तर या रस्त्याची वाट बिकट झाली आहे. कच्च्या रस्त्यावर यापूर्वी रोजगार हमी योजनेंतर्गत मातीकरण करण्यात आले. मात्र पुन्हा त्या रस्त्याकडे प्रशासनाने ढुंकूनही पाहिले नाही, अशी ओरड इथल्या वाड्या-वस्त्यांतील नागरिक करत आहेत. हा रस्ता व्हावा याकरिता ग्रामस्थ अनेक वर्षांपासून प्रशासनाच्या उंबऱ्यावर पोहचून निराशेपोटी परत येत आहे. मात्र प्रशासन रस्त्याच्या समस्येकडे उदासीनता दाखवत असल्याचे या रस्त्याच्या परिस्थितीकडे पाहिल्यानंतर लक्षात येईल.

पेंढरी व बोराळा गावाकडे जाणाऱ्या रस्त्याचे मजबुतीकरण अद्यापपर्यंत करण्यात आलेले नाही. मातीकरण करून हा रस्ता सोडण्यात आला आहे. पुढे यावर डांबर म्हणा किंवा सिमेंट काँक्रीटीकरण करण्यात आलेले नाही. हा रस्ता व्हावा याकरिता अनेकदा मागण्या करण्यात आल्या मात्र त्याकडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याची शंका पेंढरी ग्रामस्थ विलास गावित यांनी व्यक्त केली आहे.

वास्तविक तो रस्ता तानसा वनविभाग हद्दीत येत असल्याने तांत्रिक अडचणी निर्माण होत आहे. या रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळावी याकरिता वनविभागाकडे 3/2 चा प्रस्ताव सादर केलेला आहे. वन्यजीव विभागाच्या परवानगी शिवाय रस्त्याचे करणे शक्य नाही, असे अघई ग्राम पंचायतीचे ग्राम विकास अधिकारी सूर्यकांत क्षीरसागर यांनी स्पष्ट केले.

## भांडण सोडवण्यास गेला आणि जीवास मुकला

भांडणे पाहून अनिल दुधाडे (25) याने सहभाग घेत भांडण सोडविण्याचा प्रयत्न सुरू केला. मात्र याच दरम्यान संदीप डामलेचा भाऊ दीपक येथे आला असता आपल्या भावास अनिल दुधाडे मारत असल्याचा गैरसमज होत त्याने अनिलच्या बरगडीजवळ, मानेवर डाव्या दंडावर, कंबरेवर सपासप वार करून जीवे ठार मारले. गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी टिटवाळा पोलीस स्टेशनच्या हद्दीत खुनाची घटना घडली असून पोलिसांनी सात तासाच्या आत फरार झालेल्या आरोपींना अटक केली. भांडणे सोडविण्यास गेलेल्या मात्र आपला जीव गमवावा लागल्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. टिटवाळा पोलीस स्टेशनचे व.पो.नि. राजू वंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## नगरसेवक प्रकाश पेणकर यांच्या निधनामुळे रिक्षा चालकांचे नेतृत्व हरपले

**कल्याण :** रिक्षा चालक मालक टॅक्सी युनियनचे अध्यक्ष रिक्षाचालकांचे आधारस्तंभ, शिवसेनेचे पालिकेतील सभागृहनेते, स्थायी समितीचे माजी सभापती, कल्याण शहर सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळाचे संस्थापक असणारे प्रकाश तथा नाना पेणकर (68) यांचे आज रुग्णालयात उपचार सुरु असताना निधन झाले.



ऐन गणेशोत्सवापूर्वी त्यांचे निधन झाल्याने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळावर दुखाचे सावट पसरले आहे. गेल्या काही महिन्यापासून पेणकर हे यकृताच्या आजारावर उपचार घेत होते. तीन महिन्यापूर्वी त्यांच्या एका मुलाने यकृत प्रत्यारोपण केले होते. कल्याण तसेच ठाणे जिल्ह्यातील प्रमुख शहरात रिक्षाचालक-मालक टॅक्सी युनियनच्या शाखेची निर्मिती करून रिक्षाचालकांसाठी पतपेढी देखील निर्माण केली होती.

कल्याणातील शिवसेनेचे पहिल्या फळीतील कार्यकर्ते अशी त्यांची ओळख होती. त्यांनी शिवसैनिक म्हणून आपल्या कारकीर्दीची सुरुवात करून मग कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत नगरसेवक, स्थायी समिती सभापती, परिवहन सभापती, सभागृह नेते आदी महत्वाच्या पदांवरही काम केले. तर कल्याण डोंबिवलीतील विविध पदांसोबत ते रिक्षा संघटनेचे नेते म्हणूनही ते ओळखले जात. गेल्या काही महिन्यांपासून प्रकृती अस्वास्थ्यामुळे सार्वजनिक कार्यक्रमांना ते उपस्थित राहत नव्हते. त्यांच्या अकस्मात जाण्याने शिवसेना तसेच रिक्षाचालकांचे खंबीर नेतृत्व हरपल्याची भावना निर्माण झाली आहे.

कल्याण डोंबिवली मोहने टिटवाळा आदी भागात रिक्षाचालकांनी रिक्षा बंद करण्याचा निर्णय घेतला. रात्री 9 वाजता त्यांच्यावर बैलबाजार स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. येणार असून नाना यांच्या पश्चात त्यांची पत्नी दोन मुले असा परिवार आहे. दरम्यान गेल्या वर्ष दिड वर्षाच्या कालावधीत शिवसेनेच्या विविध ज्येष्ठ नगरसेवक पदाधिकारी यांचे निधन झाले आहे. त्या दुःखातून शिवसैनिक सावरत असतानाच आता प्रकाश पेणकर यांच्या निधनाने त्यांच्यावर शोककळा पसरली आहे. कल्याणातील राजकीय पक्षाच्या विविध मान्यवरांनी पेणकर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

## ठामपाच्यावतीने "आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिवस" साजरा

**ठाणे:** हवा प्रदूषणाच्या दुष्परिणामांबाबत नागरिकांमध्ये व्यापक प्रमाणात जागृती निर्माण होण्यासाठी ठाणे महापालिकेच्या वतीने "वाहनांमुळे होणारे प्रदूषण नियंत्रणाकरिता मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करुन "आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिवस" मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



यावेळी परिवहन समिती सभापती विलास जोशी, परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, प्रादेशिक परिवहन विभागाचे विश्वेश्वर शिंदे, प्रदूषण नियंत्रण अधिकारी मनीषा प्रधान, सिनिअर केमिस्ट राजू जाधव, विद्या सावंत, ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या प्रा. डॉ.कोकणे, औदयोगिक विभागाचे संचालक रोहित मिलन्स, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी, ज्ञानसाधना महाविद्यालयाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच परिवहन सेवेचे कर्मचारी आदी उपस्थित होते.

कोरोना काळात लॉकडाऊमुळे हवा मोठ्या प्रमाणात शुद्ध झाली आणि आकाश निरभ्र व निळेशार दिसू लागले. त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघाने (UNO) 7 सप्टेंबर 2020 हा दिवस 'इंटरनॅशनल क्लीन एअर डे फॉर ब्लू स्काय" म्हणून घोषित केला असून प्रत्येक वर्षी हा 'निळ्याशार आकाशासाठी स्वच्छ हवा दिन' म्हणून साजरा करण्यात येत आहे. यावर्षीही ठाणे महापालिकेच्यावतीने 7 सप्टेंबर 2021 रोजी आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिवस" मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

## ग्रामपंचायतींसाठी घोषवाक्य लेखन स्पर्धा

**ठाणे:** ग्रामीण भागामध्ये स्वच्छतेची संस्कृती रुजावी आणि लोकसहभागातून शाश्वत स्वच्छता टिकून राहावी म्हणून राज्याच्या पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाच्या वतीने ग्रामपंचायतकरीता राज्यस्तरीय घोषवाक्य लेखन स्पर्धा आयोजित केली आहे. ग्रामपंचायतीनी त्यांच्या क्षेत्रातील मोकळ्या भिंतीवर जास्तीत जास्त उत्कृष्ट घोषवाक्य लेखन करून या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भाऊसाहेब दांगडे यांनी केले आहे.

या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या ग्रामपंचायतीनी गावात झालेल्या सर्व घोषवाक्याचे छायाचित्र एकत्रितपणे 15 सप्टेंबर 2021 पर्यंत पंचायत समितीस्तरावर गट विकास अधिकारी यांच्याकडे सादर करणे अनिवार्य आहे. हे घोषवाक्य भिंतीवर रंगवण्यासाठी किमान सहा फूट बाय चार असा निश्चित आकार असावा. घोषवाक्य लिहिताना शौचालयाचा नियमित वापर, लहान मुलांच्या विष्ठेचे व्यवस्थापन, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, गोबर्धन, ओला-सुका व प्लास्टिक कचरा विलगीकरण इत्यादी विषयांवर घोषवाक्य लिहायची आहेत. ग्रामपंचायतीने गावस्तरावर सार्वजनिक जागा, बाजारपेठा, ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, सार्वजनिक सभागृह आदी ठिकाणी हागणदारीमुक्त अधिक या संकल्पनेतील प्रत्येक घटकावर जास्तीत जास्त घोषवाक्य लिहावित. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना दिनांक 2 ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरावर गौरविण्यात येणार असल्याचे प्रकल्प संचालक ( जल जीवन मिशन) दादाभाऊ गुंजाळ यांनी सांगितले.



**ठाणे जिल्हा वृत्तपत्र विक्रेता सेनेकडून गणेशोत्सवानिमित्त आरती संग्रहाची छपाई करण्यात आली असून त्याचे अनावरण महापौर नरेश म्हस्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ठाणे जिल्हा वृत्तपत्र विक्रेता सेनेचे विष्णु सावंत, संतोष विचारे आणि विलास सागवेकर.**



**डोंबिवली पूर्वेकडील सुनील नगर येथील राधिका गोखले (18) या विद्यार्थीनीने पर्यावरणपूरक शाडूच्या मातीने बाप्पाच्या मूर्ती साकारल्या आहेत.**

# विद्यार्थ्यांच्या प्रकल्पातून मिळाली सौर ऊर्जेची संकल्पना

### जन गण मन शाळेचा अनोखा उपक्रम

**डोंबिवली :** सध्या कोरोनामुळे सर्व शाळा बंद आहेत. तरीही विद्यार्थ्यांच्या खास प्रकल्पातून जुनी डोंबिवली पश्चिम येथील जन-गण-मन शाळेत सौर ऊर्जेची संकल्पना राबविण्यात आली आहे. संपूर्ण ठाणे जिल्ह्यात ही शाळा पर्यावरणपूरक प्रकल्प राबवत असते. कोरोना महामारीच्या परिस्थितीतही जन गण मन शाळेत विविध पर्यावरण पूरक प्रकल्प राबविण्यात आले आहेत.




जन-गण-मन शाळेच्या माध्यमातून होणाऱ्या प्रकल्पात रेन वॉटर हार्वेस्टिंग, सोलर प्रकल्प राबविण्यात येत आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार शाळेला 75 केव्ही ऊर्जेची गरज आहे. याचा विचार करत सोलार सिस्टीम उभारण्यात आली. त्यानंतर शाळेत सध्या 30 केव्ही ऊर्जा तयार केली जात आहे. ही सर्व वीज एमएसईबीला दिली जाते. यामुळे वीज निर्मिती तयार करण्यास मदत होत असून जन गण मन शाळेला विजेचे बिल कमी होत आहे. इतकेच नव्हे तर या शाळेच्या मागील बाजूस असणाऱ्या रेल्वेच्या जागेवर देखील घनकचरा प्रकल्प उभारण्यात आला होता. मात्र सध्याच्या स्थितीमध्ये रेल्वेचे काम चालू असल्यामुळे घनकचरा प्रकल्प थांबवण्यात आला असला तरी येथील खदान स्थितीत असलेल्या जागेत जनगणमन शाळेतर्फे मोठ्या प्रमाणात भराव टाकण्यात आल्यामुळे रेल्वेचे कोटी रुपये वाचले अशी माहिती देण्यात आली आहे.या शाळेमुळे आजूबाजूच्या परिसराचा मोठ्या प्रमाणात विकास झाला असल्याचे दिसून येत आहे.

कोरोनानंतर अनेक शाळांमध्ये फी संदर्भात तणाव निर्माण झाला होता. मात्र आम्ही अद्यापही विद्यार्थांना कोणत्याही प्रकारे फी संदर्भात विचारणा केली नाही त्यामुळे पालक देखील समाधानी असून पालकांना आपण समजून घेतलं तर आपल्याला देखील ते समजून घेतात असे डॉ. राजकुमार कोल्हे आणि प्रेरणा कोल्हे यांनी सांगितले.

'ठाणेवैभव' हे दैनिक मालक-मुद्रक-प्रकाशक मिलिन्द बल्लाळ यांनी मिड-डे इन्फोमिडिया लि., R/847/3, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी रबाळे, नवी मुंबई-४००७०१. महाराष्ट्र येथे छापून दामले अपार्टमेंट, टेंभीनाका, ठाणे (प) महाराष्ट्र -४००६०१ येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी नं. २५३४१५२६,२५३४८५९४ Email : thanevaibhav1975@gmail.com

# आधी वंदु तुज मोरया...

(छाया- रामसिंह, गजानन हरिमकर)



पालकमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे आणि कुटुंबिय



माजी मुख्यमंत्री, विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आणि विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते प्रवीण दरेकर यांनी भाजप ठाणे शहर अध्यक्ष आमदार निरंजन डावखरे यांच्या निवासस्थानी विराजमान गणेशाचे दर्शन घेतले. यावेळी डावखरे कुटुंबीय.



'ठाणेवैभव'चे संपादक मिलिंद बल्लाळ यांच्या निवासस्थानी श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली आहे. श्रीचे दर्शन घेताना संपादक मिलिंद बल्लाळ, कार्यकारी संपादक निखिल बल्लाळ, श्रीमती कुमुदिनी बल्लाळ, मंजुषा बल्लाळ, तेजश्री बल्लाळ आणि कुटुंबिय



आमदार प्रताप सरनाईक, नगरसेविका परिषा सरनाईक, नगरसेवक पूर्वेश सरनाईक, माजी नगरसेवक विहंग सरनाईक आणि कुटुंबीय



आमदार रवींद्र फाटक आणि नगरसेविका जयश्री फाटक श्रीचे दर्शन घेताना



निवासस्थानी श्रीचे दर्शन घेताना ठाण्याच्या उपमहापौर पल्लवी कदम, पवन कदम आणि कुटुंबीय



दर्शन घेताना महापौर नरेश मस्के



माजी विरोधी पक्षनेते हणमंत जगदाळे



ठाणे महापालिकेचे नगरसेवक सुहास देसाई यांच्या निवासस्थानी गणपतीचे दर्शन घेताना महापौर नरेश मस्के. सोबत सुहास देसाई आणि कुटुंबीय



शिवसेना कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे आणि कुटुंबीय



माजी नगरसेवक संजय तरे आणि कुटुंबीय



ठामपा सभागृहनेते अशोक वैती



ठाणे महापालिकेच्या स्थायी समितीचे सभापती संजय भोईर, नगरसेविका उषा भोईर आणि कुटुंबीय



ठामपा नगरसेवक दीपक वेतकर आणि कुटुंबीय



मनसेचे युवानेते अमित ठाकरे हे ठाणे-पालघर जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांच्या निवासस्थानी गणेशाचे दर्शन घेताना



ठाणे शहराचे माजी नगराध्यक्ष आणि खासदार सतीश प्रधान कुटुंबियांसोबत



शिवसेना ठाणे शहरप्रमुख माजी महापौर रमेश वैती आणि कुटुंबीय



विधान परिषदेतील भाजपाचे आ. रमेश पाटील गणरायाची पूजा करताना.



ठामपा नगरसेवक एकनाथ भोईर आणि नगरसेविका एकता भोईर



श्री गणेशाची पूजा करताना उत्तर भारतीय लोकसभा संघटक शशी यादव



उद्योजक भूषण भानुशाली सहकुटुंब श्री गणेशाची पूजा करताना

# तरूणाई

१. झाशीची राणी लढली ते स्वातंत्र्युद्ध कोणत्या साली झाले?
२. म. गांधींनी १९४२मध्ये कोणते आंदोलन सुरू केले?
३. टिळकांनी सुरू केलेले वृत्तपत्र कोणते?
४. होम रूल लीग कुणी स्थापन केली?
५. लाल, बाल, पाल यांची मूळ नावे काय?

## वाढवा जीके

उत्तरे- १. १८५७, २. छोडो भारत, ३. केसरी, ४. ॲनी बेझंट, ५. लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक, बिपीनचंद्र पाल

## मोलाचे विचार

आपल्यातील सर्वच जण काही अद्वितीय कामे करू शकणार नाहीत; पण आपण छोटी-छोटी कामे मोठ्या प्रेमाने करू शकतो.
- मदर टेरेसा



## टेक्नोलॉजी



# स्मार्टफोन स्लो झालाय?

हल्ली स्मार्टफोनची इनबिल्ट मेमरी कितीही असली तरी तो कालांतराने स्लो होण्याचा अनुभव आपल्याला येतो. प्रारंभी एक जीबीची असणारी मेमरी आता ८, १६ जीबीपर्यंत गेली तरी अनेक कारणामुळे आपला अँड्राईड फोन स्लो झाल्याचे जाणवते. स्मार्टफोनचा वेग कमी होण्यामागे अनेक कारणे आहेत त्यात विशेषत: जंक फाईल्स, कॅचे फाईल्सचे स्टोअरेज. तसे पाहिले तर गुगल प्लेवर स्मार्टफोन क्लिनिंगसाठी भरपूर ॲप्स उपलब्ध आहेत, पण काही ॲपच चांगल्याप्रकारे काम करू शकतात. फेसबुक, यू-ट्यूब, मेसेंजेर, डाऊनलोड केलेले गेम्स, गुगल प्ले म्युझिक यासारख्या ॲपमुळे फोनच्या वेगावर परिणाम होतो. व्हाटस अपच्या माध्यमातून येणारे व्हिडिओ, फोटो हे सुद्धा आपल्या फोनमधील बरीच जागा घेतात. त्यामुळे वेळच्या वेळी मेमरीचा आढावा घेऊन आपण मेमरी क्लिन केल्यास फोनवर येणारा ताण कमी करू शकतो.

आपल्या स्मार्टफोनमध्ये अनावश्यक ॲप असतात. जर त्याचा नियमित वापर होत नसेल तर फोनमधून काढून टाकणे, योग्य ठरेल. कारण या ॲपमुळे उगाचच मेमरी वाया जात असते. मेमरी क्लिअर करण्यासाठी सोपा मार्ग आहे, तो असा. जर एखादा ॲप काढायचा असेल किंवा त्याचा डाटा क्लिअर करायचा असेल तर सुरवातीला आपण सेटिंगमध्ये जावे त्यानंतर ॲप्स किंवा ॲप्लिकेशन मॅनेजर निवडावे. त्यानंतर आपल्याला कोणता ॲप काढून टाकायचा आहे, त्यावर क्लिक करून तो निवडणे आणि नंतर फोर्स स्टॉप हा पर्याय निवडून तो ॲप काढून टाकू शकतो. जे ॲप वापरात नाही त्याला अनइन्स्टॉल केले तर तो ॲप आपल्या मोबाईमधून डिलिट होतो. तसेच प्रत्येक ॲपला क्लिअर कॅचे हा ऑप्शन येतो. त्यातून ॲपने किती मेमरी घेतली आहे, हे आपल्याला कळते. एखादेवेळी तो ॲप्स खूपच मेमरी घेत असेल तर त्याला क्लिअर कॅचे निवडून डाटा क्लिअर करणे गरजेचे आहे. याशिवाय प्ले स्टोअरमध्ये मेमरी क्लिन करणारे चांगले ॲप आहेत. त्यापैकी, क्लिन मास्टर, सिस्टिम क्लिनर, अँड्राईड बुस्टर आणि स्मार्ट रॅम बुस्टर यांचा समावेश आहे. हे फ्रि इन्स्टॉल असल्यामुळे आणि ते सतत अपडेट असल्यामुळे स्मार्टफोनची मेमरी कायम राहण्यासाठी उपयुक्त ठरतात. परिणामी आपला स्मार्टफोन कासवगतीने काम करणार नाही, याचीही खबरदारी घेतो.


## फॅशनविश्व

# स्ट्रेट कट पँटचा नवा ट्रेंड

स्ट्रेट कट पँट म्हणजे सरळसोट विजार सध्या फॅशनमध्ये इन थिंग बनली आहे. या पँटमुळे मोहक आणि सुसंस्कृत लूक येण्यास मदत होते. या विजारी विविध प्रकारची छपाई असलेल्या, एम्ब्रायॅडरी केलेल्या किंवा साध्या प्लेन रंगात मिळतात. स्ट्रेट कट पॅन्ट किंवा सरळसोट विजारी तुम्ही उंच आणि बारीक असल्याचा आभास देतात. त्या विविधांगी असतात. या पॅन्ट घालून तुम्ही अधिक उठावदार कशा दिसू शकाल, याचे काही कानमंत्र जाणून घेऊया.

जास्त उंचीच्या फुलांची छपाई असलेल्या ट्युनिक प्रकारच्या कुर्त्याखाली ब्रोकेड कापडाच्या विजारी किंवा इतर प्रिंटेट विजारी घालू शकता. यावर घालण्यात येणारा कुर्ता साधा असावा, जेणेकरून पँट उठावदार दिसेल.

घोट्याच्या उंचीपर्यंत येणारी पँट तुम्ही योग्य रितीने वापरली तर भन्नाट लूक मिळू शकतो. कोणत्याही प्रसंगासाठी ही पँट उत्तम पोशाख ठरु शकते. मात्र ही पँट घातल्यानंतर उंच टाचेचे सँडल्स घालावेत. त्यामुळे सौंदर्यात भरच घालते.



कार्यालयात जाताना घालण्याचा शर्ट असो की कमी उंचीचा कुर्ता, स्ट्रेट कट पँटवर तो उठून दिसतो. फक्त एक स्टोल किंवा दुपट्टा गळ्याभोवती गुंडाळला की झालं. पण लक्षात ठेवा, तुमची पँट आणि कुर्ते फार विरोधी रंगातले असू नयेत. म्हणजे तुमचा साधेपणा अधोरेखित होईल.

स्ट्रेट कट पॅट सर्व ऋतूत वापरता येतात. त्यामुळे वॉर्डरोबमध्ये त्या असायलाच हव्यात. या पँटबरोबर तुम्ही वेगवेगळ्या प्रकारचे कुर्ते किंवा ट्युनिक वापरु शकता. हा प्रकार वापरुन तुम्ही दिमाखदारपणे वावरु शकता. कपड्यांची कोणतीही शैली अंगिकारा, कपाटातली स्ट्रेट कट पँट तुमचा डौल निश्चितच वाढवेल.

# बायोमेडिकल इंजिनिअरिंगचे वाढते महत्त्व

*रोगाचे निदान करण्यासाठी आणि उपचारासाठी जैववैद्यकीय अभियांत्रिकी (बायोमेडिकल इंजिनिअरिंग)चे तंत्र महत्त्वाचे मानले जाते. रुग्णालयातील अतिदक्षता विभाग, आपत्कालिन विभाग, शस्त्रक्रिया विभाग, वैद्यकीय प्रयोगशाळा यासारख्या ठिकाणी वापरण्यात येणाऱ्या वैद्यकीय उपकरण हाताळण्यासाठी बायोमेडिकल इंजिनिअरिंगचा विद्यार्थी महत्त्वाची भूमिका बजावतो. ज्या विद्यार्थ्यांना भविष्यात औषध आणि शास्त्रात करियर करायचे आहे त्यांच्यासाठी बायोमेडिकल इंजिनिअरिंग हा एक चांगला पर्याय म्हणून उभा राहत आहे. विशेष म्हणजे कृत्रिम अवयवाची निर्मिती करताना बायोमेडिकलचे तंत्र आणि शास्त्राचा आधार घेतला जातो. कृत्रिम अवयव हे गरजू रुग्णांसाठी वरदान ठरत असून बायोमेडिकलशिवाय शक्य नाही.*

बायोमेडिकल इंजिनिअरिंग म्हणजे इंजिनिरिंग क्षेत्रातील तंत्र आणि रचनेचा उपयोग हा वैद्यकीय उपचारासाठी आणि साधनासाठी करणे होय. कृत्रिम हृदयाची रचना हे बायोमेडिकल इंजिनिअरिंगच्या तंत्राचे फलीत मानले जाते. रुग्णांवर उपचार करताना अनेक चाचण्या घेतल्या जातात आणि उपचाराची दिशा ठरविली जाते. त्यासाठी एमआरआय, सिटी स्कॅन, इजी यासारख्या चाचण्या रोगाचे निदान करण्यास हातभार लावतात. याच बायोमेडिकल इंजिनिअरिंगची विभागणी होऊन त्याचे रुपांतर क्लिनिकल इंजिनिअरिंग आणि रिहॅबिटेशन इंजिनिअरिंगमध्ये होते. इंजिनिअरिंगचे तत्व आणि अंमलबजावणीचे सूत्र आपण समजून घेतले तर तर वैद्यकीय उपकरणाचा वापर करताना त्याचां वापर करता येऊ शकतो.

या क्षेत्रात करियर करणाऱ्या विद्यार्थ्याला संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यासाठी सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर या दोन्ही गोष्टी समजून घेणे गरजेचे आहे. रुग्णांवर डॉक्टर उपचार करताना बायोमेडिकल इंजिनिअर असलेला सहकारी या तंत्राच्या साह्याने मदत करू शकतो आणि डॉक्टरांच्या गरजा पूर्ण करू शकतो. औषध आणि शास्त्र क्षेत्रात काम करणाऱ्या विद्यार्थ्याला संयमाबरोबरच रुची असणेही तितकेच महत्त्वाचे आहे.



बायोमेडिकल इंजिनिअरिंगच्या शाखेच्या उत्पादन किंवा सेवा क्षेत्रात विद्यार्थी काम करू शकतो. बड्या रुग्णालयात आणि हेल्थकेअर सेंटरमध्ये असणाऱ्या अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणावर देखरेख ठेवण्यासाठी क्लिनिकल इंजिनिअरधारक विद्यार्थ्याची गरज असते. उपकरणाची मांडणी करण्यापासून ते त्याची कार्यक्षमता टिकवण्यापर्यंतची सर्व जबाबदारी क्लिनिकल इंजिनिअरला स्वीकारावी लागते. तर रिहॅबिटेशन इंजिनिअर हा वैद्यकीय उपकरण निर्मिती प्रक्रियेत सहभागी असतो. शारीरिकदृष्ट्या आणि मानसिकदृष्ट्या विकलांग असलेल्या रुग्णांसाठी उपकरणे तयार करताना साह्यभूत ठरू शकतो.

बायोमेडिकलधारक विद्यार्थ्याला महिन्याकाठी २५ ते ३० हजार रुपये वेतन मिळू शकते. अर्थात हॉस्पिटल किंवा वैद्यकीय संस्था मोठी असेल तर अशा ठिकाणी मिळणारे उत्पन्नही चांगले असू शकते.




# ट्विटरवरून नोकरी शोधा!

आजकालच्या तरुणाईला सोशल मिडियामुळे नोकरीसाठी भटकण्याची वेळ येत नाही. मात्र त्यांना लिंकडेन ही सोशल साईट नोकरी शोधण्यासाठी उत्तम असल्याचे वाटते. परंतु ट्विटरसुद्धा नोकरी शोधण्यासाठी चांगला पर्याय निर्माण झाला आहे. आपल्याला ज्या क्षेत्रात करियर करायचे आहे, त्या क्षेत्रातील वरिष्ठांना, अधिकाऱ्यांना फॉलो करणे, रिट्विट करणे किंवा त्यांच्या मतांवर आपले मत व्यक्त केले पाहिजे. ज्या कंपनीत काम करायची इच्छा आहे, त्या कंपनीला तर न चुकता फॉलो करायला हवे.

ट्विटरच्या माध्यमातून कंपनी किंवा अधिकाऱ्यांच्या सतत संपर्कात राहिल्यामुळे कंपनीच्या अकाऊंटवरून किंवा स्वत:च्या अकाऊंटवरून अधिकारी नोकरीच्या संधीबाबत संकेत देत असतात आणि तशी माहितीही पुरवतात. आपले क्षेत्र वगळून अन्य क्षेत्रातील मान्यवर लोकांनाही फॉलो केले पाहिजे. मित्र, सहकारी, नातेवाईक जी व्यक्ती आपल्या ओळखीची आहे आणि ज्यांचे ट्विटर अकाऊंट आहे, त्यांच्या सतत संपर्कात राहायला हवे. त्यानुसार ते ज्या ठिकाणी काम करतात, तेथे उपलब्ध होणाऱ्या नोकरीची माहिती मिळणे सहज सोपे जाते. आपण स्वत:ही ट्विटरवरून आपली मते मांडली पाहिजेत. विविध क्षेत्रात घडणाऱ्या घडामोडीवर टिप्पणी करणे, तसेच आपल्याला समजलेली नवीन माहितीही शेअर केल्यास समोरच्या व्यक्तीला आपले व्यक्तिमत्त्व, विचार समजू शकतात.

याशिवाय ट्विटर बेसिक सर्चचाही आपण उपयोग करू शकतो. ट्विटरच्या होम पेजवर उजव्या बाजूला त्याबाबतचे नेव्हीगेशन उपलब्ध आहे. तसेच ट्विटर ॲडव्हान्स्ड सर्चसुद्धा नोकरी शोधण्यासाठी मदत करू शकतो. हॅशटॅग जॉब असाही सर्च करून नोकरीसंदर्भातील जाहीराती किंवा नोटीस पाहू शकतो आणि त्याचे वेळोवेळी येणारे अपडेट आपल्या अकाऊंटवर येत राहतात.

*अलीकडीकल काळात पादत्राणांमध्ये शूजचा वापर वाढला आहे. विशेष म्हणजे आज तरुणी आणि महिलाही शूज वापरत आहेत. स्पोर्टस् शूजसारखा प्रकार पूर्वी खेळाडूच वापरत असत; पण आता कॉलेजगोईंग तरुणींपासून महिलाही त्यांचा वापर अधिक प्रमाणात करताना दिसत आहेत. आज शूजमध्ये असंख्य व्हरायटी पाहायला मिळते.*


# आकर्षक बुटांच्या दुनियेत...

**✻ चेल्सा बूट :** हे बूट औपचारिक प्रकारात मोडतात. या बुटांना लेस नसते शिवाय ते घोट्यापर्यंत उंच असतात. हे बुट जीन्स किंवा इतर कुठल्याही औपचारिक प्रसंगी वापरल्या जाणाऱ्या पोशाखावर चालून जातात. हे बुट त्यांच्या उंचीमुळे बाहेर दिसतात.

**✻ जोधपूर बूट :** जोधपूर बूट हे चेल्सा बुटाचा अनौपचारीक प्रकार आहे. खडबडीत दिसणाऱ्या या बुटांना वरून पट्ट्यासारखे डिझाईन असते. त्यामुळे ते अधिक औपचारीक दिसतात. हिपस्टर प्रकारात या बुटांना विशेष दर्जा देता येईल.

**✻ ड्रेस बूट :** कार्यालयीत किंवा व्यवसाय करणाऱ्यांसाठी हे बूट योग्य आहेत. हे बूट ऑक्सफर्ड किंवा ब्रोग बुटांसारखेच घोट्याच्या उंचीपर्यंत येतात. कोणत्याही औपचारिक प्रसंगात तुम्ही वापरु शकता.







**✻ चुक्का बूट :** हे अनौपचारिक प्रकारातले बूट आहेत. ते तुम्ही खाकी विजारीवर किंवा जीन्सवरही घालू शकता. कोण्त्याही प्रकारच्या कपड्यांवर आणि कातड्याच्या जाकीटावर ते घालता येतात.

**✻ टिम्बरलॅंड बूट :** हे बूट पाणीरोधक म्हणून लोकप्रिय आहेत. पाण्यात काम करणाऱ्यांसाठी ते बनवले गेले, मात्र वाढत्या लोकप्रियतेने कायमच वापरात आले.

**✻ बायकर बूट :** हे बूट त्यांच्या जास्त लांबीमुळे आणि ओबडधोबड रुपामुळे फक्त मोटारसायकलस्वारच वापरायचे. आणि म्हणूनच बाजारात ते बायकर्स बूट नावाने मिळायला लागले. कालांतराने हे बूट वापरण्याचा पायंडाच पडून गेला. मग बायकर्स पेक्षा इतर सामान्य लोकांमध्ये जास्त लोकप्रिय झाले. जर तुम्ही मोटारसायकलस्वार असाल तर हे बूट आणि जाकीट यांची निश्चितच खरेदी झाली पाहिजे.

# अभिमान वाटाव्या अशा चार गोष्टी....

*कधी-कधी पालकांशी एखाद्या मुद्द्यावरून चर्चा करणारे मुले नकळतपणे बोलून जातात की, तुम्हाला काय माहित किंवा तुम्हाला त्यात काय कळते? असं जेव्हा मुलं किंवा मुली बोलतात तेव्हा पालकांना वाटू लागते की आपला पाल्य मोठा होऊ लागला आहे. परंतु त्याचवेळी मुलांनाहीअसा भास होतो की आपण आता मोठे होऊ लागलो आहेत. आई-वडिलांपेक्षा आपल्याला अधिक कळते किंवा समजते. परंतु स्वत:चा अभिमान बाळगण्यासाठी नोकरी असणे, स्वतंत्रपणे राहणे किंवा स्वत:ची गाडी असणे इतकेच पुरेसे आहे काय? त्याचे उत्तर नाहीच असे असेल. कारण समाजात घडणाऱ्या किंवा अनुभवास येणाऱ्या अशा अनेक गोष्टी असतात, की त्या पाल्यांना माहित देखील नसतात आणि ते उगाचच स्वत:वर अभिमान बाळगत फिरत असतात. पुढील काही बाबी अशा आहेत की, त्याजर आपल्या अंगी असतील तर तुम्ही स्वाभिमान किंवा स्वत:वर गर्व करण्यास हरकत नाही. अर्थात कोणताही व्यक्ती परिपूर्ण नसतो. परंतु दोष टाळून निर्दोष वागण्यावर भर देण्याचा प्रयत्न करायला हवा.*

**मित्रमंडळीशी दोस्ती :** शालेय, कॉलेज आणि करियरमधून वाटचाल करत असताना मित्रमंडळींशी दोस्ती टिकवणे फार अवघड बाब मानली जाते. नवीन मित्र जमवताना जुन्या मित्रांचा विसर पडू नये, याची काळजी आपण घ्यायला हवी. मित्रांकडून मिळणारे मार्गदर्शन, सल्ला कधी उपयोगी पडेल, हे सांगता येत नाही. त्यामुळे शक्य तेवढे मित्रांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. महिन्यातून एकदा तरी डिनरचे आयोजन केले पाहिजे, जेणेकरून अनुभवाचे, जुन्या दिवसाचे शेअरिंग होऊन आपला मूड फ्रेश होईल. त्याचबरोबर अडचणींवरही सल्लामसलत झाल्यास मनावरचा भार हलका होऊ शकतो.



**ध्येय निश्चित करणे :** युवक-युवतींनी आपले ध्येय, उद्दिष्ट्य निश्चित केली पाहिजेत. ते तुमचे स्वप्न नसेल, परंतु त्या दिशेने हळूहळू का होईना वाटचाल केली पाहिजेत. ध्येयाच्या दिशेने टाकलेले प्रत्येक पाऊल ते आपल्यातील आत्मविश्वास वाढविते. येणाऱ्या अडचणींवर मात करून आपण ते ध्येय कसे तडीस नेता येईल, याचाच नेहमी विचार केला पाहिजे.

**स्वावलंबी होणे :** नोकरी असूनही तुम्ही स्वत:चे घर घेण्यास असमर्थ असाल तर तुम्हाला त्यात कमीपणा बाळगण्याचे कारण नाही. घरात राहूनही बचत कशी वाढवता येईल याचा विचार केला पाहिजे. घरच्या कामात हातभार लावून उधळपट्टी न करता नोकरीतून मिळणाऱ्या पैसा कसा वाढविता येईल, याचा विचार केला पाहिजे. त्यातून तुमच्यातील स्वतंत्रवृत्ती वाढीस लागतेच तसेच बचतीची सवय लागते. लग्नासाठी किंवा घर घेण्यासाठी आर्थिक नियोजन करताना पालकांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. त्यातून तुमच्यातील आर्थिक स्वावलंबीपणा वाढीस लागेल आणि ही बाब तुम्हाला अभिमानास्पद वाटू लागेल.

**प्रयत्नशील राहणे :** स्वप्नपूर्तीच्या आनंदापेक्षा प्रयत्नाचा आनंद अधिक मोठा असतो, असे म्हटले जाते. युवकांनी सतत प्रयत्नशील राहणे, ही बाब सुद्धा त्याला अभिमानास्पद वाटणारी असते. नोकरी नसली तरी त्यासाठी त्याच्याकडून होणारे प्रयत्न हे त्याचा आत्मविश्वास वाढवितात. चिकाटी, जिद्द आणि प्रयत्न हे गुण त्याच्या अंगी असतील, तो स्वत:बाबत अभिमान बाळगत असतो.

**छंद जोपासणे :** नोकरी मिळवताना किंवा कॉलेजजीवनात अभ्यास असताना आपले छंदाकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे आपण आठवड्यातील काही वेळ राखून ठेवला पाहिजे. पुस्तक वाचणे, पेंटिंग करणे, मैदानावर खेळायला जाणे, फिरायला जाणे, धावणे. त्यामुळे कामाच्या दगदगीमुळे आलेली उदासिनता, कंटाळा दूर होण्यास हातभार लागेल.

**ध्येयात स्पष्टता असावी :** कॉलेज सुटल्यावर तुम्ही कोठे जाणार, या स्वरुपाचे प्रश्न पालक विचारत नाहीत. एका ठराविक वयानंतर पालकही तुमच्यावर निर्णय घेण्याचे अधिकार सोडून देतात. तुम्ही काय ठरविले आहे, भविष्यातील योजना काय, याबाबतही पालकही निर्णय तुम्हालाच घ्यायला लावतात. अशावेळी आपल्या विचारात आणि ठरविलेल्या ध्येयात स्पष्टता असावी. जेणेकरून भविष्याकडे वाटचाल करताना गोंधळ उडणार नाही आणि पालकांनाही प्रत्येकवेळी स्पष्टीकरण देण्याची वेळ भासणार नाही.

## दोस्ती इंग्रजीशी

magic : अर्थ : जादू, जादूचा
He turned the boy into a rabbit by magic.
त्याने जादूने या मुलाचा ससा केला.

fail : अर्थ : अपयशी होणे, नापास होणे.
No one failed in the exam.
परीक्षेत कोणीच नापास झाले नाही.

radio : अर्थ : ऐकण्याचे एक साधन, रेडिओ, आकाशवाणी.
Let's listen to the news on the radio
आपण रेडिओवरील बातम्या ऐकूया.


bad : अर्थ : वाईट
The giants were very bad.
ते राक्षस फार वाईट होते.

## हसरा कोपरा



एकदा गणपतरावांना पार्वतीबाईंनी विचारले, काय हो हल्ली वजन कमी करण्याऐवजी वाढवण्यासाठी का प्रयत्न करत आहात? काय झालंय काय तुम्हाला? अचानकपणे हे वजन वाढवण्याचं फॅड कुठून आलंय? यावर गणपतराव म्हणाले, 'अगं काही नाही, कुणाला सांगू नकोस, पण पण त्याचं काय आहे, काही दिवसांनी सगळे गावकरी मिळून माझी सुवर्णतुला करणार आहेत आणि तेवढे सोने मला देणार आहेत. म्हणूनच हा सगळा खटाटोप आहे.''

# युवा शाहिरांचे गणरायाला नमन



संडे स्पेशल

विघ्नहर्ता श्री गणेशाच्या उत्सवाची आपल्याकडे मोठी परंपरा आहे. दहा दिवस चालणाऱ्या या उत्सहाने सर्वत्र चैतन्याचे वातावरण दिसून येते. सकल कलांचा अधिपती असलेल्या श्री गणरायाची आराधना करताना कलावंत मंडळी नेहमीच अग्रेसर असतात. आणि याची प्रचिती सुप्रसिध्द युवा शाहिर जोडी रामानंद उगले आणि कल्याण उगले यांनी आणून दिली आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने

शब्द स्वरुपी गणा नमितो
ऐक रसिका जरा
ताल सुरांनी आळवितो मी
रिध्दी सिध्दीच्या वरा

हा गण शाहीर रामानंद आणि कल्याण या दोघांनी यू ट्यूब चॅनलवर सादर केला आहे. या गाण्याचे वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्रातील नावाजलेल्या युवा शाहिरांच्या स्वराविष्काराची एक आगळीवेगळी अनुभुती रसिकांना ऐकायला मिळत आहे. या गणाच्या निमित्ताने विविध शहरातील जवळपास पस्तीस युवा शाहिरांना एकत्र आणण्याचा विक्रम रामानंद आणि कल्याण या जोडीने केला आहे.

कल्याण उगले यांनी लिहिलेला हा गण व्हिडिओ स्वरुपात असून त्याची सुरुवात अर्थातच रामानंद उगले याच्या दमदार आवाजाने झाली आहे. त्याच्यासोबत प्रसाद विभुते, होनराज मावळे, पृथ्वीराज माळी, माधवी माळी, यशवंत जाधव, अजिंक्य लिंगायत, संतोष साळुंके, कांचन उगले, लक्ष्मण भोसले, मनोज थोरे, विजय काटे, विक्रांत राजपूत या युवा शाहिरांप्रमाणे शिवानी कुलकर्णी हिने अतिशय तन्मयतेने हा गण सादर करुन श्री गणेशाच्या चरणी आपला भक्तिभाव अर्पण केला आहे. या सर्वांचे आकर्षक पेहराव, शाहिरी फेटे आणि आवाजातील सच्चेपणा ऐकताना आणि पाहतानाही मनाला प्रसन्नता देऊन जातो. या गायकांना कोरसमध्ये हरिश उगले, शुभम केंद्रे, अनिल घोगरे, किशोर धारासुरे, अजय अंभोरे यांनी उत्तम साथसंगत केली असून पांडुरंग घोटकर, क्रुष्णा मुसळे, कल्याण उगले आणि सागर उदावंत यांनी वादक कलाकार म्हणून महत्वपूर्ण बाजू सांभाळली आहे. याशिवाय म्युझिक अरेंजिंग, मिक्सिंग आणि मास्टरिंगमध्ये दर्शन पेडगावकर याने आपले कौशल्य दर्शवित या गणाला एका उंचीवर नेऊन ठेवले आहे. गायक कलावंताप्रमाणेच एक अभ्यासू तंत्रज्ञ म्हणून दर्शनचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल. रामानंद - कल्याणच्या आधीच्या गाण्याप्रमाणेच या गाण्यालाही रसिक प्रतिसाद देतील यात शंका नाही.

- विजय न्यायाधीश
9822839756





**ओं नमोजि गणनायका । सर्वसिद्धिफळदायक।**
**अज्ञानभ्रांती छेदका। बोधरुपा॥**

ओंकाराचं प्रतिक, जो सुखकर्ता, जो दुःखहर्ता आहे, उत्पत्ती-स्थिती लय हे सर्व ज्याचा प्रत्यक्ष आश्रय करतात; अशा मंगेलमुर्ती गजाननाचं स्वागत झालेलं आहे. देवळातला, घरातला गजानन आपण पुजतोच पण आता बोधरूपांने तो पुजायचा आहे. पिंडातील भ्रम, भ्रांती, अज्ञान जाईल अशा प्रकारे त्याची ओळख घ्यायची आहे. 'गणपती' म्हणजे पौराणिक कथांमध्ये सांगितल्याप्रमाणे, शंकरानी निर्माण केलेल्या सेवकांना 'गण' म्हणतात. 'गण' म्हणजे ॲटम असाही एक अर्थ आहे. ('Atomic energy' म्हणतो ना आपण) 'पती' याचा अर्थ समूहाचा नायक (लीड करणारा) समर्थ म्हणतात,

अनुताप तेथे विरक्ती। भावार्थ तेथे भक्ती। स्वानंद तेथे स्वरुप॥ अहो, तापल्याशिवाय, पोळल्याशिवाय म्हणजेच अनुताप झाल्याशिवाय कुठलाही भक्त विरक्त होत नाही, भक्ती आणि उपासनेला लागत नाही. स्वानंद प्रत्यक्ष गजाननाच्या ठायी आहे. आपण अथर्वशीर्ष का म्हणतो? 'अ' म्हणजे नाही किंवा विरुद्ध (Opposite) 'थर्व' म्हणजे चंचलता, कंपन पावणारा, 'शीर्ष' म्हणजे डोकं. माझ्या शीर्षातील चंचलता, कंपन (भाव, भावना, विचारांची) स्थिर करणारा.

प्रत्येक उपनिषदाने गणेशाचं स्तवन करुनच आपलं विवेचन केलय. आपला आद्यग्रंथ ऋग्वेद त्यातही प्रथम गणेशाचं स्मरण आहे. रामायण आणि महाभारतात देखील गणेशाच स्तवन केलंय. महाभारताचा लेखकच गणेश आहे. मांगल्याच प्रतिक म्हणजे गणपती. सगळ्या संतांनी गणेशाची अनेक रूपं उलगडून दाखवली आहेत.

माउली म्हणतात, 'सर्व स्मृती म्हणजे गजाननाचे अवयव आहेत. सर्व पुराणं म्हणजे मणी-मेखला, अलंकार आहेत, जे गजाननाने धारण केले आहेत. अकार, उकार, मकार, अर्धमात्रा अनुस्वार असा साडेतीन मात्रांचा मिळून हो ओकांर रूप गणेश प्रगट झालेला आहे. उत्पत्ती, स्थिती, लय असलेलं ते आदिबीज आहे. माउलींचे समकालीन 'संत नामदेव', ते म्हणतात

**लंबोदरा शोभे तुझा शुंडादंड।**
**करीतसे खंड दुश्‍चित्तांचा॥**

हे गजानना तुझी सोंड कशी शोभून दिसतेय आणि तिच्यात एवढी ताकद आहे की, ती दुश्‍चित्तांचा नायनाट करते.

'संत एकनाथ' म्हणतात, 'नमो श्री एकदंता। एकी दाविसी अनेकता। परी एकात्मता न मोडे॥'

गणपतीची अनेक नावं आहेत. पण विविधतेमध्ये एकात्मता जाणवते.

## सुखांतिका

डॉ. नेहा वैद्य
nehamvaidya1105@gmail.com



'संत तुकाराम महाराज म्हणतात, 'ओकांर प्रधान रुप गणेशाचे। अकार तो ब्रह्मा, उकार तो विष्णू, मकार तो महेश जाणियेला॥'

समर्थांनी तर किती गांव? दासबोधात 'गणेशस्तवन' समास लिहिलाय. मनाच्या श्लोकांची सुरुवात गणेशाला वंदन करुनच केली आहे.

गणाधीश जो ईश सर्वांगुणांचा। मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा। सगुण निर्गुणाचा समन्वय साधलाय. तो गणांचा आणि गुणांचा अधिपती आहे. म्हणून तो गणेश आणि गुणेश या नावाने ओळखला जातो. गणेशामध्ये ज्ञान, क्रिया आणि द्रव्यशक्ती असे तीनही गुण आहेत. कारण ज्ञान संपादन करण्याकरिता सत्त्व गुण हवा. कुठलीही क्रिया/कर्म करायचं असेल रजोगुण आवश्यक आहे. द्रव्यशक्ती तमोगुणाशिवाय प्राप्त होत नाही.सर्वदूर गायली जाणारी गजाननाची आरती समर्थांनीच लिहिली आहे.

माघ शुद्ध चतुर्थीला गणेश जयंती, तर भाद्रपद शुद्ध चतुर्थी म्हणजे 'गणेश चतुर्थी' या दिवशी त्या गणेशाचं आगमन झालेलं आहे. जागृती, स्वप्न, सुशुप्ति आणि तुरिया अशा चार अवस्था आहेत. त्यातली चौथी अवस्था म्हणून चतुर्थी जी प्राप्त झाल्यानंतर मन, बुद्धी, अहंकार लोप पावणार आहेत. असा हा प्रणव ओंकार 'प्र' म्हणजे प्रकर्शाने. आपण प्रकर्शाने त्या श्री गणरायाचं स्तवन करायचं आहे. अगदी मनाचा लय होईपर्यंत. समर्थांनी फार सुंदर लिहिलंय,

**ऐसा सर्वांगे सुंदरु। सकळ विद्यांचा आगरु।**
**त्यासी माझा नमस्कारु। साष्टांग भावे॥**

गणेश चतुर्थी नंतर येतात त्या गौरी. त्यालाच महालक्ष्मीचा सण असेही म्हणतात, 'लक्ष्मी' यात 'लक्ष्य' आणि लक्ष असे दोनही अर्थ अभिप्रेत आहेत. श्री देवतेचा विचार केल्यास लक्ष्मीला प्रतिशब्द म्हणून वेद आणि उपनिषदात 'श्री' हा शब्द येतो. सामान्यतः संपत्ती, प्रगती, भरभराट या सगळ्यांचा अर्थ पैसे व स्थावर मालमत्ता असा घेतात. खरंतर ते फक्त व्यवहारातील एक चलन आहे. भारतीय अभिजात संस्कृती सर्वसमावेशक अशा लक्ष्मीचा अभ्यास सांगते. म्हणूनच लक्ष्मीचे आठ मार्ग सांगितले आहेत. हीच ती 'अष्टलक्ष्मी संकल्पना' 'लक्ष्य' म्हणजे ध्येय, हेतू. आपल्या आयुष्याचं लक्ष्यं/उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आपण या पृथ्वीवर येतो तेंव्हा काही साधने बरोबर घेऊन येतो. ती पूर्ण करणारा मी म्हणजे कर्ता. जी कामं मी पूर्ण करणार आहे ते माझं कर्म आणि त्यासाठी जे जे लागणार आहे ते स्त्रोत म्हणजेच या अष्टलक्ष्मी. त्यातल्या आदि लक्ष्मीने आपल्याला व्यापून टाकलं आहे. आदि म्हणजे सुरुवात वेदशास्त्रात असं सांगितलय, 'तुम्ही जन्म घेताना जी मुळात घेऊन येता, सुरुवातीपासून बरोबर आणता ती म्हणजे आदिलक्ष्मी. ही लक्ष्मी म्हणजेच आरोग्य, कुटुंब , शरीर, संस्कृती आणि शिक्षण. आपण काय घेऊन आलोय हे कळलेच नाही तर आपल्याला काय हवे आहे ते सुद्धा समजत नाही. त्यामुळे काय बोलावं हे देखील समजत नाही.. सुक्त म्हणजे चांगल बोललं गेलेलं. म्हणजे इथे सरस्वती, श्री शारदेचा प्रवेश होतो. वैखरी प्रगट झाली की सरस्वती. समर्थांनी 'शारदास्तवन' या समासात पहिल्याच ओवीत म्हटलंय,

**आतां वंदीन वेदमाता। श्रीशारदा ब्रह्मसुता।**
**शब्दमूळ वाग्देवता। महामाया॥**

'श्री' आहे म्हणून शारदा आहे. अहो, नाण्याच्या दोन्ही बाजू छापल्या गेल्या असतील तर त्याला महत्त्व. इथे नाणं म्हणजे आपला देह. दोन्ही बाजू म्हणजे जाणीव आणि शक्ती. जाणीव म्हणजे श्री गणेश आणि शक्ती म्हणजे श्री. शारदा. जाणीवेप्रमाणे शक्तीचा वापर झाला पाहिजे नाहीतर शक्ती क्षीण होत जाते. वय देहाला आहे आत्म्याला नाही. श्री म्हणजे शक्ती, श्री म्हणजे सौंदर्य. पण बाहेरचं नाही तर अंतरंगातील सौंदर्य. रुप कसं असावं हे आपल्या हातात नाही. म्हणून कुणी रुपाचा गर्व करु नये. समर्थांनी सुंदर सांगितलय.,

**रुप लावण्य अभ्यासिता न ये। सहज गुणासी न चाले उपाये।**
**म्हणून धरावी सोये। आगांतुक गुणांची॥**

म्हणजे सद्गुण जाणीवपूर्वक धरावे. आपल्याकडे पुरुषांना 'श्रीयुत' आणि स्त्रीयांना श्रीमती म्हणतात. म्हणजेच प्रत्येक स्त्री-पुरुषाकडे अंतरंगातील सौंदर्य हवंच. म्हणजेच या वेळेस त्या गौरींना सजवतांना आपल्या पिंडात कुठलेही विषय येता कामा नये. त्या गजाननाला आणि महालक्ष्मीला वंदन करताना एवढच मागणं मागू या, 'संपूर्ण जगावर जे कोरोनाचे संकट आलं आहे, ते लवकरात लवकर संपू दे, आणि सर्वांना आयुरारोग्य लाभू दे.'

**"गणपती बाप्पा मोरया"**

# हे मना... ( मनाच्या श्लोकांचे संक्षिप्त विवेचन )

**न बोले रे मना राघवेंवीण काहीं । जनीं वाउगें बोलता सूख नाहीं ।**
**घडीनें घडी काळ आयुष्य नेतो । देह्यांती तुला कोण सोडूं पहातो ।**


श्रीसमर्थ जनी हा शब्द सामान्य जनांसाठी वापरत आहेत. संसारातील घटनांबद्दल वायफळ बडबड करत उर्जेचा अपव्यय करण्याऐवजी भगवंताचे नाव घेण्याची सवय जोपासावी असे ते लोकांना सुचवत आहेत. ही सवय जीवाला जितकी लवकर लावून घेता येईल तितके चांगले कारण काळ सरत राहातो. उतारवयात भगवंताचे नाव घेऊ म्हटलं तरी जमत नाही. म्हातारपणात आपल्या बडबडीने आजूबाजूचे लोक त्रस्त होतात. अंतिम काळी अशा माणसाला कोण सोडवणार?

**रघूनायकावीण वायां सिणावें । जनासारिखें वेर्थ कां वोसणावें ।**
**सदा सर्वदा नाम वाचें वसों दे । अहंता मनीं पापिणी ते नसों दे ।**

भगवंत सोडून अन्य विषयांच्या मागे लागता लागता मनुष्याची दमछाक होते. ईश्वर प्राप्तीचे ध्येय डोळ्यासमोर नसेल तर सामान्य माणूस व्यर्थ घडामोडींमध्ये व बडबडीमध्ये आपला वेळ व शक्ती खर्च करतो. म्हणूनच श्रीसमर्थ सतत भगवंताचे नाम आपल्या मुखी असावे असे सांगतात. अहंकाराच्या प्रभावाखाली मनुष्य चारचौघांमध्ये आपली छाप पाडण्याच्या नादात वल्गना करतो. खऱ्या साधकाने आपले वेगळेपण जपले पाहिजे.

- डॉ. वैशाली वावीकर

# "अस्वस्थ काळाची स्वगतं"




**आकाश ठणकतंय**
**धरती सुन्न**
**भरवसा उडून गेलाय**
**एकमेकांवरचा**
**आणि पोरकेपणा**
**दत्तक घेतलेल्या अपत्यासारखा**
**वारसहीन !**

गेली सव्वा वर्षे आपण भयाच्या निर्वात पोकळीत अक्षरशः गरागरा फिरत आहोत. उद्या उजाडेल याची कोणतीच शाश्वती नाही. भूतकाळातले विचित्र संदर्भ, वर्तमान काळाने उघडलेला जबडा आणि भविष्यकाळाची अनामिक वाणी मनुष्यप्राण्याला कणाकणाने पोखरत आहे. त्याचा आकस्मिक हल्ला होऊ नये म्हणून मुटकुळं करुन घराच्या अंधाऱ्या कोपऱ्यात गुपचूप पडून आहोत. जगाच्या कानाकोपऱ्यात हीच परिस्थिती. हे झाले शरीराचे आणि मनाचे? ते तर पार गोठून गेलंय. आतापर्यंत मनाला बजावून ठेवले होते कदापि व्यक्त व्हायचे नाही नाहीतर 'तो' येईल. पण... पण वाफ दाबून ठेवली की त्याचा स्फोट आज किंवा उद्या होणारच. ती प्राणपणाने साठवलेली तप्त वाफ कवितांच्या रुपाने अखेर बाहेर पडलीच ती म्हणजे कवी अशोक बागवे यांच्या 'मौनाचा निःशब्द कोलाहल' या कविता संग्रहातून.

भावविभोर शब्दांशी लीलया खेळणाऱ्या या कवीच्या मनाच्या गाभाऱ्यात साठलेला काळाकुट्ट कोलाहल जेव्हा ज्वालामुखीसारखा फेसाळत बाहेर येतो तेव्हा वाचक क्षणभर गोठून जातो.

**खोल खोल भुयारात मी ढकलला जातोय**
**विवराच्या तोंडाचा भगभगीत प्रकाश**
**हळूहळू अंधारात विलीन होणारा...**
**विलय हाच मध्यबिंदू ठरावा माझ्या परिघाचा**
**मी भोगतोय चैतन्यहीन वैभव**
**जिवंत राहण्याचं !**

कवी असं बोलून जातो तेव्हा अंधारुन आल्यासारखं वाटतं. हे खिन्नतेचे, उदासीनतेचे ढग आपला हळूहळू ताबा घेऊ पाहत आहेत हेही जाणवतं. मनातली विलक्षण घुसमट ही अशी वाफेसारखी बाहेर पडणारी. त्याला अडवणार कोण? खुद्द कवीने मलपृष्ठावर कबुली दिली आहे की, 'हे सगळं परावलंबित्व मनाला अतिशय कष्टदायक होतं. म्हणून या कविता लिहून मी माझा आतला आकांत शब्दांमध्ये बांधण्याचा प्रयत्न केला.' या पार्श्वभूमीवर मला आणीबाणीचे अशांत दिवस स्मरतात. 'पाचूच्या हिरव्या माहेरी ऊन हळदीचे आले' असं तरल, प्रसन्न गाणे लिहिणारे पाडगावकर त्या आणीबाणीच्या वावटळीमुळे त्यांचेही मन विषण्ण, सैरभैर झाले आणि क्षणातच भाव कवितेचा हात झिडकारुन 'लाथेच्या भयाने डावा हात गांडीवर ठेवून उजव्या हाताने सलाम.. सलाम भाई.. सबको सलाम' अशा गोळीबंद कवितेशी केलेली जवळीक वाचकांना धक्का देणारी ठरली. थोड्या फरकाने इथेही तसेच बागवे सरांनी या विचित्र बंदिवासात मनातलं साठलेलं, उदासपण, घुसमटलेपण कवितांच्या रुपाने बाहेर काढली. असे असूनही ही कविता करोना जंतूंची अजिबात नाही. तर ही कविता मानवी मनात चेतवलेल्या भयकथेची, अकस्मात थांबणाऱ्या श्वासाची आणि अज्ञात, अटळ प्रवासाची आहे. कविता संग्रहात सामावलेल्या पंच्याहत्तर कविता प्रत्येकवेळी वेगवेगळी अनुभूती देतात. प्रत्येक कविता किमान दोनदा वाचल्यावर त्याची दुसरी बाजूही अलगद आपल्याला गवसते. या संग्रहातील कविता मुक्तछंदातून आपल्याशी थेट संवाद साधतात आणि केवळ अक्षरांसाठी साठवलेला श्वास वाचकाला समर्थपणे देऊ करतात. हे सारंच विलक्षण.

'सृजनसंवाद प्रकाशन'चे हे पहिलेच पुस्तक. पण शंभर पुस्तकांचा टप्पा पार केल्याच्या अनुभवांप्रमाणे हा संग्रह सुंदररीत्या साकारला असून पहिलेपणाच्या कोणत्याही खुणा जाणवत नाहीत. मुखपृष्ठ, कागदाचा पोत, मांडणी उत्कृष्ट आणि आतील मजकूर तर सर्वोत्कृष्ट!

**रामदास खरे, ठाणे.**
9869014319.
(मौनाचा निःशब्द कोलाहल,
कवी अशोक बागवे, पृष्ठ : 104,
मूल्य : 200/- , सृजनसंवाद प्रकाशन, ठाणे.)

# गणोबाची आई !

आधीच सांगते, वरील शब्द माझे नाहीत, हं! प्रसिद्ध आदरणीय लेखिका सरोजिनी बाबर यांच्या, 'सण व उत्सव', या संपादित पुस्तकात बाबा पद्मजी, यांच्या 'हिंदू लोकांच्या सणाविषयी', या लेखात हे संबोधन आहे. गणपती सणाबद्दल ते लिहीतात, 'याच सणात गौरीचा सण येतो. ही बाई गणोबाची आई!' - पृ. क्र. 30. जेव्हा भक्त देवावर प्रेम करतो, रुसतो, रागवतो, भांडतो त्या नात्यात मायेने लाड ही येतातच, खरेना?

गौरी म्हणजे श्रीमंत घरात दिलेली, वर्षभराने येणारी लाडाची लेक आहे बर कां! ती घरातली तुळस आहे, जाईची वेल आहे, पृथ्वी आहे, अनघ्रात पवित्र आई आहे. लक्ष्मी रुपात विष्णू पत्नी तर पार्वती रुपात शिवाची शक्ती आहे. स्नानाच्या वेळी तनाला लावलेल्या हळदीतून जन्मलेल्या गणेशाची जन्मदात्री आहे.

भादव्यात पेरण्या आटोपल्या असतात, रान आळसावलेलं हिरवेगार समुद्रासारखे दिसते, आप्तांची हौस पुरवायला चित्त वृत्ती बहरलेल्या असतात. त्यात दूर श्रीमंती घरी गेलेली लेक, वर्षांनी येणार म्हटल्यावर घरातल्यांचे काळीज सुपाएवढे न झाल्यास नवल! गौरी सुताचे आगमन होवून ते स्थानापन्न झालेले असतात. गौराई सर्व आवरुन महादेवाला परवानगी विचारते. पण, देवाने तिचा पदर धरून ठेवलेला असतो. नवरा जे विचारतो तेच ते विचारतात. 'माहेरी का चालली आहेस?' त्यावर गौरी म्हणते, 'तूप शेवया खाईन, दोन दिवस राहीन, जाई होवून मळयात जाईन, मग मी येईन.' किती तुमच्या आमच्यासारखी साधी इच्छा! त्यावर देव म्हणतात, 'मी मग माळी होवून तुला भेटीन!' इथे भावनाविष्कार पहा, नेहमीप्रमाणे नवऱ्यालासोबत यायचेच आहे, सुखासुखी सोडायचे नाही. देव विचारतात, 'तू येताना काय आणणार?' गौरी शेवटी स्त्री, ती एकेक दागिना आणीन म्हणते! पण, स्त्री भावना दागिन्यांत नाही तर नात्यांत-मुलां-माणसांत गुंतते हे खरं!

शेवटी गौरी सासरहून निघते. पण तेवढयात 'गणाने घुंगरु हरविले असते' म्हणून तो रडत असतो. ती त्याची समजूत घालते त्यामुळे उशीर होतो. बायागात म्हणतात, 'आली आली गौराय, येत्यच हुती, आंब्याच



आंब तोडीत हुती, रसाच्या वाटया भरीत हुती,' सामान्य स्त्री भावना, देवीला जोडून लोकगीतातून मन समाधानाची वृत्ती दिसते.

गौराईला आणायला परकऱ्या पोरी गरत्या बाया नटून सजून पाणवठ्यावर जायला निघतात. त्यांच्या हाती,पानाफुलांनी, सजलेला तांब्या आहे तो मोठया तोऱ्यात डोईवर धरला आहे, तेरडयाची पान, हळदी-कुंकू, नारळ सोबत आहे. ते ठेक्यात आपल्या दागिन्यांचे वर्णन करीत गात आहेत. भले त्यांच्या घरी ते दागिने नसतील ही पण अहो ते मनात तर आहेत ना, मग झाल तर! नदी, विहीरी पाशींचे पाच-सात खडे त्या तांब्यात ठेवतात. त्याला हळदी-कुंकू, फुल वाहतात व लगबगीने घराकडे निघतात. गाणं चालूच आहे, 'गौराई म्हन्ती म्हायार दिसं म्हायार, म्हायार बाई सोनार वाडं गं...!' पुन्हा आपल्या घराच्या असलेल्या नसलेल्या वैभवाच कौतुक करतात.

## मनोमनी

माधवी कुलकर्णी
madhavi_kulkarni03@yahoo.com



आता गौरी मिरवत घराच्या उंबऱ्यापाशी येते. जिच्या, डोईवर तांब्या असतो, तिचे पाय कोमट दुधा पाण्याने धुतात. पावलावरती स्वस्तिक रेखतात, हळद-कुंकू, फुल वाहतात जणू ती देवीची पावलेच असतात! मग, पाऊले, कुंकवाच्या पाण्यातून ठसे उमटवित, गौरीला अभिमानाने घर दाखवितात, 'गौरी गौरी, कुठं आलीस? तुला इथं काय दिसतं?', असे भाबडेपणाने विचारतात. घरभर असलेले आपले वैभव दाखवितात. गाणं चालुच असतं, 'गौरी आली सोन्याच्या पाऊली, गौरी आली चांदीच्या पाऊली, गौरी आली गाई वासरांच्या पाऊली, गौरी आली पुत्र-पौत्रांच्या पाऊली...।' आता तरी खास सजविलेल्या स्थानावर बसवितात. नव्या वस्त्रांनी दाग-दागिन्यांनी मढवितात, तेला-तुपाचे दिवे लावतात, आणि गातात, 'रानामागली तुळस पानाफुलांची सावली, पैंजणाच्या भाराने, गवर सजली....।' गौरीबाई खूप, लांबून दमून आल्याने, बायांना तिची काळजी वाटते म्हणून साधा भाजी-भाकरीचा नैवेद्य तिला दाखवून, शांत रात्रभर विश्रांती घेऊ देतात.

दुसरा दिवस उजाडतो तो धामधुमीतच! माहेर वाशिणीची फुलापत्रींनी यथा सांग पूजा-आरती होते. महानैवेद्याचा थाट काय विचारता-सोळा भाज्या, पाच कोशिंबीरी, पुरण-वरणाचा घमघमाट सुटतो, देवी तृप्त होते, तिला विडा देतात, ब्राम्हण व सवाशिणीला जेवायला बोलवितात, सायंकाळी गौरीला भेटायला गावातल्या स्त्रिया येतात, हळदी-कुंकू, लाडू-चिवडा, पान-सुपारी देवून त्यांना खूष केले जाते. त्याही कौतुकाने म्हणतात, 'अगं बाई गौराई काय छान दिसतेय!'

माहेर वाशिण आली म्हटल्यावर, स्त्रिया गात, नाचत, खेळत हौसेने रात्र जागवितात. त्या गाण्यात महादेव गौरीच्या जीवनातले प्रसंग असतात, तिच्या वैभवाचे वर्णन असतं, 'दिवाजळी दिवटी, कापूरजळी वाती, गौराय सारकी लावण्यी, खेळू गं साऱ्या जणी! '

पहाट होते गौरीचा चेहरा मलूल दिसू लागतो आज सासरी परतायचे असते ना! सकाळी सूताच्या गाठी पाडतात त्यात हळद-कुंकू, झेंडूची फुले-पाने, बेलफळ, काशीचे फूल गुंफलेले असते. पंचामृत स्नान, धूपदिप पूजा-आरती होते. शेवयाची खीर, उदीड डाळीचा पापड यांचा नैवेद्य असतो.

गौरीला डोईवर घेवून मिरवत स्त्रिया पुन्हा पाणवठयावर येतात गाणं सुरुच असत, 'गाणे गारे पाखरा, ये रे नदी वाटंला, गौराई निघाली सासरा, ये रे ये नदी वाटंला....।' पाणवठयावर पुन्हा पूजा आरती होते, दही भाताचा नैवेद्य अर्पण करतात कारण, तिला खूप मोठा प्रवास सासरसाठी करायचा असतो. आता साश्रू नयनांनी सर्वजण तिचे विसर्जन करतात. डोळे पूसत तेथील थोडी वाळू घेवून घरी परततात, ती वाळू घराबाहेर-घरात विखरून टाकतात ज्यामुळे सुख-शांती-समृद्धी-संपत्ती-संतती नांदते-वाढते!

शिक्षणासाठी परदेशी गेलेली माझी गौरी,कोरोना काळामुळे येवू शकली नाही पण तिचा सूर माझ्या कानी येतो, "घाल घाल पिंगा वाऱ्या माझ्या अंगणात, माहेरीच्या सुवासाची करबर सात।' माते गौरी, पुढच्या वर्षी माझ्या लेकीला सोबत घेऊन ये गं, नक्की !

# स्वत:साठी वेळ महत्वाचा

**आपल्या जीवन साथीदारांसाठी, आई-वडिलांसाठी, समाजासाठी, मित्र-मैत्रिणींसाठी आपण वेळ काढून काही ना काही करतच असतो, कर्तव्य बजावत असतो. पण ज्याच्यावर आपलं सर्वाधिक प्रेम असते त्यासाठीच कर्तव्य राहूनच जाते ती व्यक्ती म्हणजे आपण जिला मी म्हणतो. स्वत:साठी काही करणे याचा अर्थ आत्मज्ञान प्राप्त करून घ्यावयाचा प्रयत्न करणे, To Find Out Who am I?**

मी साधारण माझ्या वयाच्या एकविसाव्या वर्षी आलेला अनुभव सांगतो. थोड्याश्या अपयशानंतर समुदाय किनाऱ्यावर एकटाच बसलो होतो. आजूबाजूला जवळ असे कोणीच नव्हते. कारण आलेले सगळे परत गेलेले होते. मी मानाने थोडा गंभीर होतो. आकाशाकडे बघितल्यावर निरनिराळ्या आकारांचे ढग शांतपणे आपापल्या जागी होते. पण त्यात एक चांदणी दिसत होती ती सुद्धा माझ्यासारखीच एकटी. मी त्या आकाशाकडे बघतच होतो, त्यावेळी मला काय झाले! हे नीटसे शब्दात सांगता येणार नाही पण मला काहीतरी खूप समजल्यासारखे वाटले. जगण्याचा अर्थ कळल्यासारखे वाटत होते. अशी हलचल माझ्या मनात या आधी निर्माण झाली नव्हती. एक अलौकिक आनंद प्राप्त झाला होता. काही तरी सापडल्यासारखे वाटत होते आणि ते वाटणे, काहीतरी समजणे हे शब्दबद्ध करावे असे वाटले म्हणून घेतले लिहायला.

"सांभाळत दोन्ही तिर जन्माचे धावणे, कसे यावे ओठावर माझ्यासाठी गाणे!" माणसाचं आयुष्य हे अखंड धडपडीचा प्रवाह तो वाहता ठेवण्यासाठी सतत काहीतरी करावेच लागते. शरीराला स्थिर ठेवता येते पण मन स्थिर राहीलच, असे होत नाही. मनाचे नियमन, नियंत्रण करण्यासाठी ते निर्विकार करण्यासाठी वेगळे प्रयत्न करावे लागतात. माणसाला स्वतःमध्ये स्वतःसाठी डोकावून पाहणे, त्याच्या उन्नतीसाठी आवश्यक आहे. आणि त्याकरता एकांतवास, ठेहराव आवश्यक. व्यक्तिगत जीवन संपन्न करण्यासाठी स्तब्धता, काही काळ मौन आवश्यक. कित्येक वेळेला मौन हे बोलके असू शकते. मौनाची ताकद अपार आहे. "Silence is Best Speech" अशी इंग्रजीत महान आहे. मौन म्हणजे संपूर्णपणे मन शून्य करणे, मग विचार करणे. आपल्याला मनो वैज्ञानिक सांगतात की, तुम्हाला राग अनावर झाला की, काही क्षण का होईना शांत राहा. शंभर अंक मोजा, मन एकाग्र करा. काही काळ एकटे राहिल्याने निर्भय बनण्यास मदत होते. प्रत्येकाने स्वतःसाठी अवकाश शोधणे आवश्यक आहे. आत्मपरीक्षणाची अभ्यासाने आत्मबल वाढते. बुद्धी अग्र होते. तिचे निश्चय शुद्ध होतात. मनातला गोंधळ संपतो. जीवनात निश्चितता येते. या कामासाठी पंधरा-वीस मिनिटे सुद्धा पुरतात. अशा वेळी आपल्या कुलदेवतेला क्षणभर आठवणे, भजणे म्हणजे आपला आत्मविश्वास वाढवणे होय.

आपल्या भोवतालचा हा सर्व परिसर या शब्दांच्या नादानेच गलबललेला असतो. अनेक आवाजांनी आपण घेरलेले असतो. अशा परिस्थितीत आपल्याला आपल्या अस्तित्वाचाच भान राहत नाही. मनःशांती करता प्रत्येकाने काही काळ स्वतःबरोबर राहणे इतके अशक्य आहे का? याबाबतीत एक छोटंसं उदाहरण द्यावयाचे झाल्यास "संगीत" त्यातला "पॉझ" - थांबा गाण्यात वापरलेला असतो, त्याचा परिणाम श्रोत्यांना अंतर्मुख करण्यास होतो व गायक  आपला हेतू साध्य करतो. सांगितलं स्पर्श करता येत नाही फक्त श्रवणाने ते स्वीकारता येते. गाण्यामध्ये संगीताची रचना अशी कलात्मक दृष्टीने केलेली असते की, ज्या शब्दानंतर "पॉझ" घेतल्यामुळे गाण्यातला खरा जाणकार असतो त्यांना अंतर्मुख करून गाण्यातल्या भावार्थाला भिडवतो व आवश्यक तो परिणाम हा काही सेकंदाचा पॉझ/थांबा साधतो. तद्वतच काही मिनिटांचा का होईना विराम देऊन, स्वतःसाठी वेळ देणे आवश्यक, इतर विचार शून्य करता आले पाहिजेत, म्हणजे आपल्या जगण्याला रसाळ बनविण्यासाठी एकांतात स्वतःला वेळ देणे जरुरीचे. गाण्यामध्ये आलेल्या "पॉझ"मुळे इतरांना लाईट गेल्यासारखे वाटते. निसर्गाच्या सान्निध्यात काही काळ एकटेच राहणे आनंदाची बरसात केल्यावाचून राहत नाही व त्यामुळे आलेल्या परिस्थितीशी तणावविरहित मनाने, जोमाने आपण प्रयाण करु शकतो. ध्येयाच्या दिशेने उचललेल्या प्रत्येक कृतीचा आढावा या शांत समयी घेतल्यास पुढच्या वाटचालीकडे जाण्यास प्रोत्साहन मिळते.

**- किशोर पाटणकर**
7208739160

# गिरिजाचा पुत्र गणपती

गणनायका, शुभदायका
यावे तुम्ही गिरीकंदरा
सह्याद्रीच्या हृदयामध्ये,
लेण्याद्रीच्या या मंदिरा ।।1।।
शिवनेरीच्या शिवशंभूचा
सहवास पावन लाभला
सुकडीतीरी तव मंदिरी
हो पुण्यसंचय हा भला
गिरीजात्मजा तव मूर्ती
ही सिंदूरचर्चित सुंदरा ।।2।।
तोडूनिया भवपाश हे
भवकाळ त्या गुंफातुनी
तपी बैसले, बहु कष्टले
का व्यर्थ ते योगीमुनी
भक्ती तुझी सुखदायिनी,
तप का उगा मग आचरा।।3।।
गणनायका, शुभदायका
यावे तुम्ही गिरीकंदरा



'गणनायका शुभदायका' या गाण्याचा भावार्थी संवाद. या गाण्याचे गीतकार आहेत कविवर्य वसंत बापट हे अभंग गीत कविवर्य वसंत बापट यांनी लिहिलं आहे. या गीतात अष्टविनायकातील श्री शेत्र लेण्याद्रीचा भक्तिमय महिमा वर्णिला आहे. त्याचा भावार्थ आपण पाहूया. गिरिजेचा आत्मज म्हणजे पार्वतीचा पुत्र, या अर्थाने लेण्याद्री तीर्थस्थानाला गिरिजात्मज किंवा गिरिजात्मक अस म्हणतात. इथे पार्वतीने तपश्चर्या करून गणपतीला प्रसन्न करून घेतल होतं तेव्हा श्री गजानन भाद्रपद शुद्ध चतुर्थीला बटुरूपात प्रकट झाले. पार्वती तपश्चर्या करताना म्हणाली.

"गणनायका, शुभदायका
यावे तुम्ही गिरीकंदरा"

म्हणून कवी पुढे म्हणतात. हा श्री गणेश कुठे आलाय तर सह्याद्रीच्या हृदयामध्ये लेण्याद्री मंदिरात. असं यथार्थ वर्णन या कवींनी केल आहे. पुढच्या रचनेत वसंत बापट म्हणतात. या लेण्याद्री पर्वताला शिवनेरीच्या शिवाजी महाराजांचा सहवास लाभला आहे. कारण स्वराज्य व्हावे ही तर श्रींची इच्छा असं शिवराय कायम म्हणायचे. अशा या लेण्याद्रीच्या सानिध्यात कुकडी नदी वाहते. अपभ्रंशानं  तिच नाव सुकडी असेही आहे. त्यामुळे या लेण्याद्री स्थानी पुण्यसंचय झाला आहे. या ठिकाणी सिंदूरचर्चित सुंदर अशी गिरिजात्मज मंगलमूर्ती आहे. असा हा महिमा गणेश भक्तांना कविवर्यांनी सांगितला आहे. शेवटच्या चरणामध्ये बापट असं सांगतात. अहो या गणेशाचे नाव घेतले की आपले सारे भवपाश सुटून जातात. भवकाळाच्या गुंत्यातून आपण बाजूला येतो. इथे साक्षात योगीमुनींनी कष्ट सोसून तपे केली आहेत. या सर्वातून हे शेत्र अती पावन झालेल आहे. आता आपण फक्त निर्विकारपणे त्या गजाननाची भक्ती करावी. मग तो गजानन प्रसन्न होईल. असं या गीतात सांगितलं आहे.

या गीताचा भावार्थ मी माझ्या काव्य  प्रेरणेतून मांडलेला आहे. गणेश भक्तांनाचा जो भक्तिभाव आहे. तो या भावार्थातून सांगितला आहे. कवी वसंत बापट हे महाराष्ट्राचे प्रतिभावान साहित्यिक होते. त्यांच्या काव्याचा हा आस्वाद आहे. बोला मंगलमूर्ती मोरया, गणपती बाप्पा मोरया.

**- कवी अँड रुपेश पवार**
संतवाणी अभ्यासक
9930852165

# मार्गदर्शक तत्वांचे पालन करून गणेशोत्सव साजरा करू या!

**लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरु करून शतकोत्तर रौप्य महोत्सव उलटला आहे. इंग्रजांच्या काळात भारतीय संस्कृतीची उघड उघड विटंबना होत होती. इंग्रजांच्या दमणशाही विरुद्ध तरुण एकत्र यायला तयार नव्हते. तरुणांना एकत्र आणल्याशिवाय इंग्रजांविरुद्ध लढा देणे अशक्य आहे हे ओळखून त्यांनी तरुणांना एकत्र आणण्यासाठी व त्यांच्याच देशभक्तीची मशाल पेटवण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरु केला. हळूहळू सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्राची परंपरा बनली. आजही ती परंपरा महाराष्ट्रात मोठ्या भक्तिभावाने जोपासली जाते.**



गणेशोत्सव ही महाराष्ट्राची ओळख आहे. केवळ महाराष्ट्रातच नाही तर देशात गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. दहा दिवस सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते. पण गेल्या दोन वर्षांपासून हे चित्र बदलले आहे. मागील वर्षीप्रमाणे यावर्षीही गणेशोत्सवावर कोरोनाची छाया आहे. कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा धोका लक्षात घेता गणेशोत्सवात अनावश्यक जल्लोष टाळून, गर्दीला लगाम घालत मर्यादित स्वरूपात साजरा करावा लागणार आहे. कोरोनाची दुसरी लाट ओसरली असली तरी अजून संपलेली त्यातच तिसरी लाट केंव्हाही येऊ शकते असे भाकीत तज्ज्ञांनी व्यक्त केल्याने महाराष्ट्र सरकारने गणेशोत्सव साजरा करण्याबाबत काही मार्गदर्शक तत्वे घालून दिली आहे. काहींसाठी ही मार्गदर्शक तत्वे पाळणे जिकरीचे ठरणार आहे; असे असले तरी सर्वांना ही मार्गदर्शक तत्वे सर्वांना पाळावीच लागणार आहे. प्रश्न जनतेच्या आरोग्याचा आहे. त्यात थोडीजरी बेफिकीरी केली तरी ती अंगलट येऊ शकते. दुसऱ्या लाटेचा अनुभव आपण घेतला आहे तो किती भयावह होता हे आपण पहिलेच आहे त्याची पुनरावृत्ती होऊ द्यायची नसेल तर गणेश भक्तांना सरकारने आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करावेच लागेल. एकदा का कोरोनाचे हे विघ्न नाहीसे झाले की पुन्हा गणेशोत्सव जल्लोषात साजरा करता येईल. सरकारने आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करूनही गणेशोत्सव साजरा होऊ शकतो. यावर्षी साधेपणाने गणेशोत्सव साजरा करतानाच तो पर्यावरण पूरक असावा याचीही काळजी सर्वानी घ्यावी. गणेशोत्सवाची सजावट सात्विक असावी. यात गणेश तत्व आकर्षित करणारे साहित्य, फळे, फुले, दुर्वा, पत्री, नैसर्गिक फळा, दुर्वांचा वापर आदी सर्वकाही पर्यावरण पूरकच असावे. प्लास्टिक, प्लास्टर ऑफ पॅरिस, थर्माकोल यांचा वापर कटाक्षाने टाळावा. पर्यावरणास हानी होईल अशा कोणत्याच साहित्याचा वापर या गणेशोत्सवात करु नये. श्रींची मूर्तीही शाडूचीच असावी.

गणेशोत्सव म्हणजे एकप्रकारे निसर्गाचे संवर्धन व पूजन होय. त्यामुळेच सर्वत्र नैसर्गिकतेचा आविष्कार हवा. श्री गणेशाची कृपा सर्व भक्तांवर होण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे म्हणजे या निसर्ग देवतेचा मान राखून अत्यंत सात्विकतेने यंदाचा गणेशोत्सव पर्यावरण पूरक, प्रदूषण मुक्त व सरकारने आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करून भावपूर्ण वातावरणात साजरा करु या! गणपती बाप्पा मोरया !

**- श्याम ठाणेदार, पुणे**
9922546295



# "हे गणराया"

**गजानना, श्री गणराया।**
**आधी वंदू तुज मोरया।।**

ढोलताशांच्या गजरात श्री गणरायाचं आगमन झालं. घराघरांत, गावागावांत गणराज सगुण रुपात प्रकट झाले. अगदी सहा इंचापासून ते 16 फुटांपर्यंत. "वाढता वाढता वाढे" असलेल्या गणेशाची मूर्ती म्हणजे एक चैतन्य, एक तेज! तसेच भक्तगणांमध्येही एकच चैतन्य आणि एकच उत्साहाची लाट पसरली आहे. गेले सतरा महिने थांबून राहिलेले उत्सव त्यानिमित्ताने पुन्हा एकदा सुरु झाले, असे म्हणायला हरकत नाही. हिंदू धर्माचं आराध्य दैवत म्हणजे श्री गणेश! कोणत्याही कार्याचा शुभारंभ हा श्री गणेश पूजनाने होतो.

गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा । मुळारंभ आरंभ तो निर्गुणांचा ॥

असे म्हणत समर्थ रामदासांनी मनाच्या श्लोकांचा आरंभही श्री गणेश वंदनाने केलेला आहे. श्री गणेश हा चौदा विद्या आणि चौसष्ट कला यांचा अधिपती आहे, असे हिंदू धर्मग्रंथ सांगतात. ईश म्हणजे ईश्वर! सर्व कलागुणांचा तर तो देव आहेच, तसेच निर्गुणांचा मुळारंभही तोच आहे. सगुण निर्गुण अशा सर्वांचा तो आरंभ आहे. म्हणजेच त्याच्या उपस्थितीशिवाय आणि आशीर्वादाशिवाय सगुण काय किंवा निर्गुण काय सर्वच जण अपुरे आहेत, असा हा गौरीपुत्र सुखकर्ता आणि विघ्नहर्ता आहे, अशी अपार श्रद्धा प्रत्येकाच्या मनात बालपणापासून दृढ झालेली आहे. घरोघरी उल्हासित वातावरण निर्माण करणारा गणेशोत्सव आपल्याला अनेक गोष्टी शिकवित असतो. गज म्हणजे हत्ती आणि आनन म्हणजे शीर. हत्तीचे शीर धारण केलेला हा लंबोदर म्हणजे साक्षात बुद्धीची देवता, कर्ता आणि करविता! घराघरातील सुख-दुःखात सहभागी होणारा, प्रत्येकाला आपलासा वाटणारा गणेश अनेक रुपात आपल्याला भेटतो. श्री बालगणेश, शिव-पार्वती सोबत गणेश, रिद्धी-सिद्धी समवेत गणेश, राजसिंहासनाधिष्ठित श्री गणेश, श्रीकृष्ण रूपातील श्री गणेश, मल्हारी मार्तंडाच्या रुपातील श्री गणेश यावर्षी तर ऑलिंपिक सुवर्णपदक विजेता भारताचा सुपुत्र नीरज चोप्राच्या रुपातही तो प्रकट झाला आहे. तसेच त्या त्या ठिकाणच्या नावानेही प्रसिद्ध असलेला गणेश म्हणजे तिथला राजा! ठाण्याचा राजा, लालबागचा राजा, वरळीचा राजा असा ठिकठिकाणचा राजा म्हणजे केवळ सृष्टीचा राजा! पूर्वीपासून उभ्या महाराष्ट्रात प्रत्येक घरात श्री गणरायांचे नियमितपणे दरवर्षी आगमन होते आणि मनोभावे पूजन अर्चन केले जाते. स्वातंत्र्यपूर्व काळात लोकमान्य टिळकांनी या उत्सवाला प्रथम सार्वजनिक रुपात आणले. प्रथम पुण्यातील मानाचे पाच गणपती सार्वजनिक स्वरूपात आले. पुण्या-मुंबईत सामान्य जनतेला एकत्र आणण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सवाचा मोठा सहभाग होता. तीच परंपरा आज अधिकच बहरली आहे. सामाजिक प्रश्न मांडणारे देखावे साकारणारी मंडळे आजही सातत्याने जनजागृती करताना दिसतात. "लालबागचा राजा गणेशोत्सव मंडळ" गरजूंना मदत करण्यात जसे अग्रेसर आहे तसेच शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैशिष्ट्य ठरणारा हा लोकोत्सव, जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहोचला आहे. जगाच्या पाठीवर जिथे जिथे महाराष्ट्रीयन माणूस आहे तिथे तिथे आज गणेशोत्सव साजरा केला जातोय. जसजसे या लोकोत्सवाने मोठे रूप धारण केले, तसतसे काही समाज विघातक प्रवृत्तींनीही आपले डोके वर काढले. वर्गणी रुपाने खंडणी गोळा करणे, रात्री जागे राहण्यासाठी पत्त्यांचे डाव रचणे, मोठमोठ्या मूर्तींची चढाओढ लावणे, कानठळ्या बसविणारे ध्वनिक्षेपक रात्रंदिवस सुरु ठेवणे या व अशा अनेक गोष्टी पाहता लोकमान्यांचा हेतू कुठे विरून गेला ते कळेनासे होते. पूर्वी रात्रंदिवस भजन, कीर्तन, प्रवचन अशा समाजप्रबोधनपर कार्यक्रमांची रेलचेल असे. आता कुठेतरी क्वचित भजने ऐकू येतात पण ती सुद्धा उडत्या चालीच्या गाण्यांची नक्कल करणारी! एकंदरीत प्रत्येक कार्याच्या शुभारंभी ज्याचे आवाहन केले जाते तो गणराया चराचरात भरून उरलेला आहे. त्याला तरी त्याच्या नावावर केलेली ही दुर्गुणांची उधळण सहन होणार आहे का? तसेच श्री गणेश साकारण्याचा प्रयत्न प्रत्येक कलाकार वेगवेगळ्या पद्धतीने करतो. पानांचा गणपती, फुलांच्या आकाराचा गणपती, फक्त सोंड, कान आणि डोळे हे आकार म्हणजे गणपती. अशी कल्पना या गणरायाला तरी खरी वाटेल का? श्री गणेश पुराणातून प्रकट होणारा गणराया सकल कलागुणांची देवता, सर्व सिद्धींचा नायक, बुद्धीची देवता वर्षाचे 365 दिवसच सगळ्यांवर कृपादृष्टी ठेवतच असतो, आम्ही मात्र गणेशोत्सवाचे 10 दिवस हे सगळे आठवतो आणि उरलेले 355 दिवस "मी, मी" म्हणत गर्वाने फुलत राहतो. म्हणूनच सर्वांना सद्बुद्धी दे, एवढीच इच्छा व्यक्त करून गणरायास मनःपूर्वक वंदन करूया! यावर्षी शासनाने बंधन शिथिल केले असले तरी कोरोना अदृश्य स्वरूपात हिंडतो आहे. त्याच्यापासून सावधगिरी बाळगून हा गणेशोत्सव साजरा करूया.



**मनतरंग**
सौ. नूतन बांदेकर :9773445808

**तुझ्या कृपेने दिन उगवे हा,**
**करुनी तव भजना,**
**वंदितो तुजला गजवदना।।**

# विवाहपूर्व समुपदेशन : उपयुक्त मानसशास्त्रीय संकल्पना (भाग -3)



माइंडफुलनेसच्या प्रॅक्टिसमुळे जशी जशी स्वतःबाबतची सजगता वाढत जाते तसे काही विचार आणि भावना ह्या आपल्याला अधिक स्पष्ट होऊ लागतात. यामुळे आपल्याच विचारातील काही त्रुटी आणि चुकीच्या पद्धतीने विचार करण्याची पद्धत या स्पष्ट होऊ लागतात. त्या चुका आणि त्रुटी नीटपणे कळण्यासाठी कॉग्निटिव्ह थेरपीतील काही तत्वे समजून घेऊया. डॉ. एरॉन बेक ह्यांनी ह्या विचाराच्या चुकीच्या पद्धती विशद केल्या आहेत. त्यातील नात्यांमध्ये बरेच वेळा होणारी चूक म्हणजे एखाद्या उदाहरणावरून त्या व्यक्तीचा स्वभाव मी ओळखला असे मानणे. किंबहुना इथून पुढे अश्या प्रसंगात ती व्यक्ती अशाच पद्धतीनेच वागेल असे गृहीत धरून चालणे.

बरेच वेळा आपलं वागणं हे आपला स्वभाव आणि आपल्या आजूबाजूची परिस्थिती यांच्या प्रक्रियेतून निर्माण होत असतं, हे आपण स्वतःच वागणं बघताना लक्षात घेतो. पण समोरच्या व्यक्तीच वागणं बघताना ती व्यक्ती तिच्या स्वभावामुळेच अशी वागत आहे, असा पक्का समज आपल्या डोक्यात ठेवतो. अश्या पद्धतीने विचार करून मग समोरच्या व्यक्तीच्या वागण्याकडे बघताना आपण बरेच वेळा "लेबलिंग" किंवा "त्याच्या वागण्याच्या पद्धतीवर" हे असेच आहेत किंवा हे आयुष्यात कधीही बदलणं शक्यच नाही, असा शिक्का मारून मोकळे होतो. या चुकीच्या विचार धारणेमुळे कुठल्याही नात्याचं नुकसान होऊ शकत. नातं जितकं जवळच आणि ज्या व्यक्ती आपल्याला परत परत भेटणार असतात तितकंच या चुकीच्या धारणांमुळे होणार नुकसान वाढत जात. नवरा बायको तर सततच बरोबर असतात. आपण म्हणतो तस एकदा का नाव कानफाट्या पडलं कि मग त्या माणसाचं प्रत्येक वागणं त्याच नजरेतून पाहिल जात. मग तो माणूस तसा का वागला ह्याचे खरं कारण जाणून घ्यायच्या आधीच आपण निष्कर्ष काढून मोकळे होतो. हीच विचार धारणेची चूक दोघांकडूनही होत असेल तर मग गैरसमजाच्या वाळवीने नात्याला ग्रासलं जायला वेळ लागत नाही. हे टाळण्यासाठी अश्या प्रकारची चुकीची विचार धारणा आपण अंमलात आत आहोत ह्याविषयीची जागरूकता येण गरजेचं ठरत. याबरोबरच "खाईन तर तुपाशी" किंवा "मला बाबा सगळं उत्तमच लागत.", हि विचारधारा एखाद्या गोष्टीची प्राप्ती करण्यासाठी योग्य ठरते. पण जेव्हा नात्यांची बाब येते तेव्हा माणूस म्हणून समोरच्याचा विचार करणं आणि "माणसं चुका करतातच किंबहुना चूक करतो तोच माणूस", हि विचारधारा ठेवावी लागते. त्यासाठी मागील लेखात बघितल्याप्रमाणे आपल्याला "लव्हिंग - काइंडनेस" ह्या प्रकारचं माइंडफुलनेस मेडिटेशन करण्याचा सराव करावा लागतो. त्यामुळे आपण स्वतःच्या आणि इतरांच्या चुका स्वीकारून त्या सुधारण्यासाठीच योग्य असं वातावरण निर्माण करु शकतो. स्वतःचा आणि नात्यातील माणसांचा आहे तसा स्वीकार करण्याची ताकद आपल्यामध्ये "लव्हिंग - काइंडनेस"च्या सरावामुळे निर्माण होते आणि वाढत जाते.

**जीवनाची ही घडी**

सुरुवातीच्या काही लेखांमध्ये पाहिल्याप्रमाणे लग्न झाल्यावर 'जोडपं' ह्या आपल्या ओळखीवर आपण जर का काम केलं असेल तर मग दुसऱ्याच्या चुका स्वीकारून त्याला त्या चुका सुधारण्यासाठी योग्य अशी वातावरण निर्मिती करणं हि आपली सामाईक जबाबदारी ठरते. त्यासाठी एकमेकांना धारेवर धरण्याची गरज राहत नाही. या सगळ्यासाठी काही मानसशास्त्रीय संकल्पनांची ओळख आणि त्यांचा सराव हि आवश्यक ठरतो. त्यासाठी त्या संकल्पना विवाहपूर्व जाणून घेणं आणि आपण दोघे त्याचा सराव एकत्रितरित्या कसा करणार आहोत, ते ठरवणं हे जोडपं म्हणून होणारी आपली वाटचालही आनंददायी करण्यासाठीच्या दृष्टीने उचललेले योग्य पाऊल ठरते.

**- चित्रा केळकर**
सायकॉलॉजिस्ट आणि
सर्टिफाइड लाइफ कोच

# कडोंमपाला ठेकेदाराने लावला 20 कोटींचा चुना

## बीओटी प्रकल्प रखडवणाऱ्या ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल



**कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिकेने सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या उद्देशाने 2005 साली सुरु केलेल्या बीओटी प्रकल्पाचा बोजवारा उडाला असून शासनाचा कोट्यावधी रुपयाचा चुराडा झाला आहे. प्रत्यक्षात मात्र या प्रकल्पाचा नागरिकांना लाभ झालेला नाही. आता 16 वर्षानंतर बीओटी मधील ट्रक टर्मिनससाठीच्या जागेचा गैरवापर करत त्याचे भाडे आणि व्याज थकवून पालिकेचे 20 कोटी 69 लाख रुपयाचे नुकसान केल्याचा ठपका ठेवत ठेकेदार एसएस असोसीएटसचे संचालक मथ्यू जॉन कुचीन, अनिल शहा आणि सीमा शहा यांच्या विरोधात खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.**

कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात बांधा वापर हस्तांतरित करा अर्थात बीओटी तत्वावर 2005 साली कार्यान्वित करण्यात आलेल्या योजनेत दुर्गामाता चौक येथे ट्रक टर्मिनस व पार्किंग प्लाझा, वाडेघर येथे स्पोर्ट्स क्लब, विठ्ठलवाडी पूर्वेकडे व्यापारी संकुल आणि भाजी मंडई, लालचौकी येथे कम्युनिटी सेंटर, डोंबिवली क्रीडांगणावर बांधण्यात आलेला मॉल, आधारवाडी येथे मॉल कम मल्टिप्लेक्स प्रकल्प, रुक्मिणीबाई रुग्णालयाशेजारी मॉल यासारख्या बहुद्देशीय प्रकल्पाचा समावेश होता. हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी संबधित ठेकेदारांना 36 महीन्यांची मुदत देण्यात आली होती. मात्र या सर्वच प्रकल्पाचा बोजवारा उडाला असून अद्याप एकही प्रकल्प महापालिकेच्या ताब्यात आलेला नाही. मोक्याच्या भूखंडाची मलई ठेकेदार मागील 16 वर्षापासून लाटत आहेत.

कल्याण पश्चिमेकडील दुर्गामाता चौकात प्रस्तावत करण्यात आलेल्या ट्रक टर्मिनस आणि पार्किंग प्लाझासाठी पालिकेचा आरक्षित भूखंड ठेकेदाराला 20 वर्षांच्या लीज करारावर देण्यात आला होता. त्यानंतर महासभेची रीतसर परवानगी न घेताच तत्कालीन अधिकाऱ्यांनी या लीजची मुदत 60 वर्षे पर्यत वाढवली. मात्र याकडे पालिकेचे दुर्लक्ष झाले होते. ठेकेदाराकडून हा भूखंड खोट्या कागदपत्राच्या आधारे ताब्यात घेत पालिकेची फसवणूक करण्यात आल्याचे उघड झाले आहे.

संबधित संचालकांनी एस एस असोसीएटस या दोन संस्थाच्या नावातील साधर्म्यचा फायदा घेत नियमबाह्य करारनामे करत या प्रकल्पाच्या जागेवर कर्ज घेत या जागेवर थर्ड पार्टी हक्क निर्माण केला. तर पालिकेचे 20 कोटी 69 लाख 64 हजार 585 इतके भाडे थकवले आहे.

इतकेच नव्हे तर पालिकेविरोधातच न्यायालयात याचिका दाखल केली पालिकेची आणि शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी पालिकेचे कार्यकारी अभियंता तरुण जुनेजा यांनी महापालिकेच्या वतीने खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# गणेशोत्सव निर्विघ्न व्हावा यासाठी कॉंग्रेस भरणार खड्डे

**ठाणे: ठाणे शहरात यावर्षी हजारो घरगुती गणपती व सार्वजनिक गणपतीची प्रतिष्ठापना झाली आहे. ठाणे महानगर पालिकेला गणेशोत्सव पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी असलेले खड्डे वारंवार निदर्शनास आणून देखील आवश्यक ती उपाययोजना करण्यात आलेली नाही, म्हणून ठाणे शहर(जिल्हा)कॉंग्रेस कमिटीकडून प्रत्येक ब्लॉकमधील प्रमुख रस्त्यांवर खड्डे भरो आंदोलन करण्याचा निर्णय करण्यात आलेला आहे.**

प्रत्येक ब्लॉकमध्ये हे आंदोलन करण्यात येणार असून जिल्हा कार्यालयामधून आवश्यक रेती, सिमेंट व बॅनर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. ब्लॉक अध्यक्षांनी ब्लॉकमधील कार्यक्रम निश्चित करून ब्लॉकमधील सर्व शहर पदाधिकाऱ्यांना तसे कळवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

हा कार्यक्रम मंगळवार 14 सप्टेंबर रोजी करण्याचा प्रयत्न करावा,अशा स्पष्ट सूचना ठाणे शहर कॉंग्रेस अध्यक्ष ॲड.विक्रांत चव्हाण यांनी दिल्या आहेत. ब्लॉक अध्यक्षांनी कार्यक्रमाचे नियोजन करून कार्यालयांत याची माहिती द्यावी, असे आवाहन सरचिटणीस आणि मुख्य प्रवक्ते सचिन शिंदे यांनी केले आहे.

# गणरायाला निरोप देण्यासाठी अंबरनाथ-बदलापूरला चोख व्यवस्था

**अंबरनाथ: दीड, तीन, पाच, सात आणि दहा दिवस होणाऱ्या विसर्जनासाठी नगरपरिषद मुख्याधिकारी तथा प्रशासक योगेश गोडसे यांचे नियोजन व नियंत्रणाखाली पूर्व-पश्चिम भागात ठिकठिकाणी नागरिकांच्या सोईसाठी विसर्जन पॉइंट तयार केले आहेत.**

श्री. गोडसे यांनी दीड दिवस विसर्जनाच्या दिवशी स्वतः पाहणी केली. प्रत्येक विसर्जनस्थळी नगर पालिकेचे कर्मचारी व अधिकारी यांना तैनात केले असून विसर्जनादरम्यान कोणत्याही प्रकारची दुर्घटना घडू नये यासाठी अग्निशमन प्रमुख यांनी अग्निशमन कर्मचारी वर्गाचा बचाव साहित्यासह प्रत्येक ठिकाणी चोख बंदोबस्त लावला आहे.

पाण्याची खोली जास्त असलेल्या ठिकाणी जसे वलीवली, एरंजाड, उल्हास नदी, बदलापूर गाव तलाव आदी धोकादायक ठिकाणी पट्टीचे पोहणारे योगेश साखरे यांची संस्था एक्सप्लोरर रेस्क्यू यांचे आठ पट्टीचे लाईफ गार्ड, अग्निशमन दल प्रमुख भागवत सोनोने यांच्या निर्देशानुसार तैनात ठेवले. त्याचबरोबर अंबरनाथ नगर पालिका हद्दीत पालिका मुख्याधिकारी डॉ. प्रशांत रसाळ यांच्या नियंत्रणाखाली पालिका प्रशासन गणपती विसर्जनसाठी सज्ज आहे.




अग्निशमन प्रमुख भागवत सोनोने यांनी अंबरनाथ पालिकेने निश्चित केलेल्या विसर्जनस्थळी अग्निशमन कर्मचारी व अति धोकादायक ठिकाणी पट्टीचे पोहणारे लाईफ गार्ड तैनात केल्याचे सांगितले.

अंबरनाथ येथे मनसे शहराध्यक्ष कुणाल भोईर यांनी कृत्रिम तलावाची निर्मिती केली आहे.

गेल्या 10 वर्षांपासून कानसई विभागात कृत्रिम तलाव असल्याने दीड ते 10 दिवसांच्या गणपती मूर्तींचे भावपूर्ण वातावरणात विसर्जन केले जाते.

# कल्याणमध्ये दीड दिवसांच्या गणरायाला निरोप

**कल्याण : गणेश चतुर्थीच्या दिवशी आपल्या लाडक्या गणरायाला आपल्या घरी आणून दीड दिवस मनोभावे पूजाअर्चा करून आज मोठ्या भक्तिभावाने निरोप देण्यात आला.**

कल्याण-डोंबिवलीत विविध ठिकाणी गणपती विसर्जनासाठी व्यवस्था करण्यात आली होती. कल्याणमधील गणेश घाटावर भक्तांची गर्दी पाहायला मिळाली. कल्याण-डोंबिवली शहरात सुमारे 12 हजार घरगुती तर 44 सार्वजनिक गणपतींचे विसर्जन करण्यात आले.



## जनहित फाऊंडेशनचा अभिनव उपक्रम

# महाड व चिपळूण येथील पूरग्रस्तांना मायेची ऊब



**ठाणे: महाड आणि चिपळूण येथील पूरग्रस्तबाधितांना मदतीचा हात नव्हे तर कर्तव्य म्हणून रिलायन्स फाऊंडेशन, मुंबई यांच्या मौलिक सहकार्यामुळे व जनहित फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा भारतीय विद्यार्थी सेनेचे ठाणे जिल्हा संघटक सुनिल पाटील यांच्या विद्यमाने भरीव मदत करण्यात आले.**

मु. कोड्यर, ता.महाड, जि.रायगड, मु.पोसरे न मु.साखर, ता. खेळ, जि.रत्नागिरी तसेच मु. खेर्डी, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी येथील नागरीकांना प्रत्यक्ष त्याठिकाणी जाऊन उत्तम प्रतीचे ब्लॅंकेट वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न जनहित फाऊंडेशनच्या वतीने करण्यात केला.

त्यावेळी प्रसिद्ध उद्योजक व खेडच्या साखर गांवचे सुपुत्र राजेश निकम, कोंझर गावच्या सरपंच सुवर्णा रेवणे, कोंझर ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष मनोहर कदम, कोंझरचे पोलीस पाटील, ग्राहक संरक्षण कक्षाचे रत्नागिरी जिल्हाप्रमुख व खेर्डी, चिपळूणचे रहिवासी संतोष सुर्वे, बाळकुमचे उपशाखाप्रमुख अजय पाटील, रघुवंश फार्मने संचालक रघुनाथ निकम, महाडचे सामाजिक कार्यकर्ते राजकुमार रेवणे व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी ग्रामस्थांनी रिलायन्स फाऊंडेशन व जनहित फाऊंडेशनचे आभार व्यक्त केले.

## धर्मवीर आनंद दिघे हार्ट केअर सेंटरमध्ये लवकरच शस्त्रक्रिया विभाग

# मुत्रपिंड विकारांवर होणार मोफत उपचार

**ठाणे: मुत्रपिंडाचे आजार, शस्त्रक्रिया व उपचार घेण्यासाठी रुग्णांना आता लांब जाण्याची गरज नाही. महापौर नरेश म्हस्के यांनी नागरिकांना गणेशोत्सवाच्या मुहूर्तावर भेट दिली असून महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील धर्मवीर आनंद दिघे हार्ट केअर सेंटरमध्ये मूत्रपिंडाचे आजार व त्यासंबंधी शस्त्रक्रिया विभाग सुरु करण्यात येणार आहे. तसेच याअंतर्गत मुत्रपिंड संबधित आजारावरील सर्व उपचार मोफत होणार असल्याचे महापौर नरेश म्हस्के यांनी नमूद केले.**

पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी धर्मवीर आनंद दिघे हार्ट केअर सेंटरमध्ये युरोलॉजी आणि युरोशस्त्रक्रिया विभाग सुरु करणेबाबत सूचना केली होती. त्या अनुषंगाने बुधवारी (8 सप्टेंबर) झालेल्या सर्वसाधारण सभेत याबाबतचा ठराव सर्वपक्षीय नगरसेवकांनी एकमताने मंजूर केला असून याबद्ल महापौर नरेश म्हस्के यांनी महापालिका आयुक्त डॉ विपीन शर्मा यांचे देखील आभार व्यक्त केले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील "धर्मवीर आनंद दिघे हार्ट केअर सेंटर" च्या माध्यमातून अनेक गरीब व गरजू रुग्णांना नि:शुल्क कार्डीओलाजिस्ट आणि कार्डियाक सर्जन कन्सल्टेशन, ईसीजी, 2 डी इको, टीएमटी, एंजिओग्राफी, एंजिओप्लास्टी, बायपास व व्हॉल्व्ह सर्जरी, थ्रोमोबिलीशन उपचार, ट्रोप टी व ट्रोपोनिन टेस्ट, एबीसी चाचणी आदि वैद्यकीय सेवा पुरविल्या जात आहेत.

या ठिकाणी सुपर स्पेशालिटी सेवेअंतर्गत युरो शस्त्रक्रिया विभाग सुरु करण्याबाबत पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी सूचना केली होती.

या अनुषंगाने धर्मवीर आनंद दिघे हार्ट केअर सेंटरमध्ये दोन्ही वैद्यकीय सुविधा प्लॅटिनम हॉस्पिटल लि. यांच्या माध्यमातून देण्यात येणार आहेत.


या सेवेचा फायदा ठामपा कार्यक्षेत्रातील व ठाण्या लगत असलेल्या भिवंडी, वाडा, जव्हार, कल्याण, डोंबिवली आदि परिसरातील गरीब व आर्थिक दुर्बल घटकांना होणार असल्याचे महापौर नरेश म्हस्के यांनी नमूद केले.

# भाजपा ठाणे शहर जिल्हा सचिवपदी रमेश सांगळे



**ठाणे: रमेश सांगळे यांची भाजपा ठाणे शहर जिल्हा सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ठाण्यातील खोपट येथील भाजपा कार्यालयात आयोजित कार्यक्रमात आमदार संजय केळकर व भाजपाचे ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन रमेश सांगळे यांची ही नियुक्ति करण्यात आली आहे.**

या कार्यक्रमाला नगरसेवक भरत चव्हाण,भाजपा ठाणे शहर जिल्हा सरचिटणीस विलास साठे, सरचिटणीस मनोहर सुगदरे, उपाध्यक्ष विक्रम भोईर, युवा मोर्चा ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष सारंग मेढेकर आदी उपस्थित होते.



# प्रतिभा मढवी यांच्या नगरसेवक निधीतून चौक आणि समाज मंदिराचे सुशोभीकरण





**ठाणे: नगरसेविका प्रतिभा मढवी यांच्या नगरसेवक निधीतून ठाणे महापालिका प्रभाग क्र.21 मधील विविध नागरी कामांचा शुभारंभ बुधवारी करण्यात आला.**

ठाण्यातील मल्हार सिनेमा जवळील गावंड पथ येथील चौक फेरीवाले, गर्दुल्यांनी वेढला होता. हा परिसर स्वच्छ करून या ठिकाणी नगरसेविका प्रतिभा मढवी यांच्या नगरसेवक निधीतून सूंदर शिल्प उभारण्यात आले आहे. याचे लोकार्पण बुधवारी आमदार संजय केळकर व भाजपा ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ नगरसेवक संजय वाघुले, नगरसेविका प्रतिभा मढवी, भाजपा उपाध्यक्ष डॉ. राजेश मढवी, उपाध्यक्ष सुजय पत्की, नगरसेवक सुनेश जोशी, भाजपा महिला मोर्चा ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष मृणाल पेंडसे, समर्थ नाईक आदी उपस्थित होते.

यावेळी नागरिकांनी केलेल्या मागणीची पूर्तता करत चिखलवाडी येथील दक्षिणमुखी हनुमान समाज मंदिराचे सुशोभीकरण करण्यात आले. त्याचे उदघाटनही आमदार संजय केळकर व भाजपा ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या समाज मंदिरात नागरिकांना छोटेछोटे विविध कार्यक्रम आता करता येणार आहेत. नगरसेविका प्रतिभा मढवी व भाजपाचे ठाणे शहर जिल्हा उपाध्यक्ष राजेश मढवी यांनी नागरिकांनी केलेल्या मागण्यांची त्वरित दखल घेऊन गावंड पथ येथील चौकात शिल्प व समाज मंदिराचे सुशोभीकरण केल्याबद्दल स्थानिक नागरिकांनी त्यांचे आभार मानत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.